# गुन्हे तपास

**श्री. प्रकाश शिवराम भडांगे**
संकलक, सहा, संचालक.
महाराष्ट्र पोलिस अकेडमी
नासिक.

# अनुक्रमणिका


| अ. नं. | पाठाचे नांव | पान नं. |
|---|---|---|
| १ | गुन्हयाचा तपास | १ |
| २ | निरीक्षण | ४ |
| ३ | भौतिक दुवे गोळा करणे. | ६ |
| ४ | बातमीदार कसे मिळविता येतील | ७ |
| ५ | पहिली खबर | १० |
| ६ | साक्षीदार | १२ |
| ७ | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी तपासी अंमलदाराने (डिटेक्टीव्हने) काय कारवाई करावी. | १४ |
| ८ | संशयिताचा पाठलाग. | १६ |
| ९ | गुन्हयाच्या रेकॉर्डवरुन माहिती घेणे. | १८ |
| १० | पंचनामे तयार करणे. | २० |
| ११ | प्रेताचे पंचनामे व प्रेत उकरणे. | २१ |
| १२ | इन्कवेस्ट रिपोर्ट | २३ |
| १३ | अटक | २४ |
| १४ | रिमांड | २६ |
| १५ | कबुली जबाब | २७ |
| १६ | ओळख परेड | २९ |
| १७ | झडत्या व जप्त्या | ३२ |
| १८ | गुन्हयांचे प्रकार | ३५ |
| १९ | केस डायरी | ३६ |
| २० | दोषा रोप-पत्र | ३७ |
| २१ | अखेरचा अहवाल | ३९ |
| २२ | चार्जशीट | ४० |
| २३ | विशिष्ट प्रकारच्या गुन्हयाचा तपास | ४१ |
| २४ | दंगे | ४२ |
| २५ | बलात्कार | ४३ |
| २६ | मोटार अपघात | ४३ |
| २७ | ठकबाजी | ४४ |
| २८ | अफरा तफर | ४५ |
| २९ | बनाबट नाणी | ४५ |
| ३० | काळा बाजार | ४७ |
| ३१ | प्रकरण दैनंदिनी (केस डायरी) | ४८ |

# गुन्हयाचा तपास

"गुन्हा उघडकीस आणणे " व " गुन्हयाचा तपास करणे" या गोष्टी एकमेकांशी संबधित असल्या तरी एकमेकांपासून वेगळया आहेत.

**१. गुन्हा उघडकीस आणणे.**

उघडकीस न आलेला गुन्हा किंवा ज्या गुन्हयात आरापी माहित नाही असा गुन्हा कौशल्याने व शास्त्रीय उपायांच्या साहयाने उघडकीस आणणे व त्यातील गुन्हेगार माहित करणे.

**२. गुन्हयाचा तपास करणे.**

मुख्यत्वे करुन अरोपी व घडलेला गुन्हा यांचा तोंडी, लेखी किंवा शास्त्रीय पद्धतीने उपलब्ध पुराव्याच्या आधारांच्या साहयाने संबंध ओडून अशाप्रकारे कायद्याच्या दृष्टीने ग्राहय असणारा पुरावा न्यायालया समोर सादर करणे.

. वास्तविक पहाता "गुन्हा उघडकीस आणणे" हा गुन्हयाच्या तपास करण याचाच एक भाग आहे. मात्र गुन्हा अघडकीस आणण्यासाठी तपासी अंमलदार याचे अंगी आवश्यक असणारे गुण व गुन्हयाचा तपास करण्यासठी आवश्यक असणारे गुण हे एकमेकांपासून काहीसे भिन्न आहेत. तेव्हा या दोन्हीं गोष्टींचा वेगवेगळा विचार करणे जरुरीचे आहे.

आपल्याकडे दरोडे, जबरीच्या चोऱ्या, घरफोडया चोऱ्या व इतर अशा प्रकारच्या मालमत्ते संबंधाच्या गुन्हयांचे उघडकीस आणण्याचे प्रमाण फारच कमी आहे. सरासरी २५ ते ३० टक्के आहे. आणि हयातील बहुतेक गुन्हे हे फिर्यादाने आरोपीला पकडून दिल्यामुळे किंवा नशीबाने अचानक उघडकीस आलेले असतात. पोलिसांचे कौशल्यकिंवा यशास्त्रीय मार्गाचा यपायोग करुन खऱ्या अर्थाने गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

मालमत्तेच्या गुन्हयाखेरीज काही वेळा खुन, खुनाचा प्रयत्न, मोटार अपघात अशा प्रकारचे गुन्हे सुध्दा ताबडतोब उघडकीस न येता यते पोलिस खात्याला आव्हान ठरु शकतात.

पूर्वी असा समज होता की, उघडकीस न आलेल्या गुन्हयाचा शोध करण्यासाठी पोलिस अंमलदाराचे अंगी जन्मतः च काही गुण असावे लागतात. परंतु अनुभवाने असे सिध्द झाले आहे की, कष्ट करण्याची तयारी असलेला कोणताही पोलिस अंमलदार गुन्हा अघडकीस आणण्यासाठी लागणारे गुण आत्मसात करु शकता व तो उत्तम प्रकारचा तपास अंमलदार बनु शकतो.

## गुन्हा उघडकीस आणण्यासठी आवश्यक असणारे गुण

**१. चिकाटीः-**

आरोपीचा शोध करते वेळी आपल्याला बऱ्याच वेळी अपयश येण्याची शक्यता असते. अशा वेळी निराश न होता नेटाने तपास चालु ठेवला पाहिजे. तपासात मिळालेला एखादा दुवा किंवा धागा जरी निरोपयोगी ठरला तरी आपण दुसरा दुवा शोधुन त्याच्या तपासाला लागले पाहिजे. व पूर्वीच्याच उत्साहाने तपास केला पाहीजे. संशयिताकडे विचारपूस करतांना बऱ्याच वेळा काही फल निष्पती होत नाही. अशावेळी आपण नाऊमेद होता कामा नये. मनाचा तोल ढासळू न देता संशयिताकडे विचारपूस तासन्तास करण्याची तयारी ठेवली पाहीजे.

**२. गुन्हेगारांची माहितीः-**

चांगल्या पोलिस अंमलदाराला आपल्या भागातील त्याचप्रमाणे आतुबाजूच्या भागातील सर्व गुन्हेगारांची माहिती त्याप्रमाणे त्याची गुन्हे करण्याची पध्दत, त्याचे नातेवाईक, मित्र, साक्षीदार, त्यांच्या यनेहमी बसण्या उठण्याच्या यजागा या सर्व प्रकारची माहिती असणे आवश्यक आहे. त्यावरुन एखादा गुन्हा झाल्याबरोबर गुन्हयाच्या अध्दती वरुन संशयिताचा अंदाज करुनत्याचेकडे तपास करता येईल.

**३. सुक्ष्म निरिक्षण :-**

गुन्हा अघडकीस आणण्याचा दृष्टीने गुन्हयाच्या जागेचे सुक्ष्म निरिक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. गुन्हयाच्या जागी आपणांस अनेक अशा वस्तू मिळण्याची शक्यता असते की ज्यामुळे आरोपी शोधुन काढणे शक्य होऊ शकेल. उदा. हाताच्या बोटांचे ठसे, गुन्हेगाराची वस्तु, रुमाल, चप्पल धोबी मार्कअसलेला कपडा, गुन्हेगाराने हाताळलेली उखादी वस्तु वगैरे. याकरिता तपासी अंमलदाराने गुन्हयाची खबर मिळताच तातडीने गुन्हायाचे जागी भेट देऊन तेथीलं कोणत्याही वस्तुची हलवा हलव होणार नाही याची दक्षता घेतली पाहीजे. त्याच प्रमाणे गुन्हयाचे जागेच्या आजुबाजूच्या जागेचे परिसराचे अत्यंत बारकाईने, घाई-गडबड न करता व्यवस्थित निरिक्षण केले पाहिजे. आवश्यकतेनुसार वैज्ञानिक पुरावा मिळविणे कामी संबंधीत तज्ञाची मदत घेता येईल.

४. तत्परताः-

गुन्हा उघडकीस आणण्याचे दृष्टीने तत्परता हा गुण अत्यंत महत्वाचा आहे. गुन्हयाची खबर मिळताच त्या ठिकाणी विनाविलंब भेट देऊन तेथील परिस्थिताचे निरीक्षण केले पाहिजे. त्या ठिकाणी योग्य तो पहारा नेमावा. पोलीस स्टेशनमध्ये उपलब्ध असलेले रेकॉर्ड उदा. जी. सी. आर. के. सी. आर., हिस्ट्रीशीटरा, सर्वेलन्स रजि.-क्राईम रजि. गाववारी भाग ११ ते ४ व इतर माहिती वरुन संशयितांची यादी तयार करुन त्यांचा ताबडतोब शोध घेणे आवश्यक वाटल्यास त्यांच्या झडत्या घ्याव्यात. वरील कामे तुम्ही जितक्या तत्परतेने कराल तितकी आपल्याला तपासात यश मिळण्याची शक्यता जास्त असते. वरील कामात जर विलंब केला तर आवश्यक असणासरा पुरावा नष्ट होण्याची शक्यता असते. उदा. घटना स्थळावर असणारे दुवे हाताळले जातात किंवा नष्ट होतात. आरोपी आपल्याकडे असलेल्या मालमत्तेची किंवा गुन्हयाशी संबंधित असलेल्या वस्तुची विल्हेवाट लावू शकतात.

५. भौगोलिक परिस्थितीचे ज्ञानः-

प्रत्येक पोलिस अंमलदाराला त्याच्या भागातील भौगोलिक परिस्थितीचे संपूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे. काही वेळा फिर्यादीकडून आरोपी कोणत्या दिशेने गेला ही माहिती मिळू शकते. अशा वेळी पोलिस अंमलदार अंदाज घेऊन त्या दिशेने आरोपीचा शोध घेऊन योग्य दिशेने तपास करु शकतो.

६. बातमीदार तयार करण्याचे कौशल्यः-

गुन्हेगारांचा शोध घेण्याचे दृष्टीने बातमीदार तयार करणे व त्यांचे कडून माहिती काढणे हा गुन्हे शोधण्याचे दृष्टीनी महत्वाचा गुण आहे. पो. स्टे. मध्ये अनेक प्रकारचे लोक अनेक प्रकारच्या कामा करीता येत असतात. त्यातून तपासी अंमलदाराने गुन्हेगारांची माहिती देऊ शकतील असे बातमीदार तयार केले पाहिजेत. गुन्हेगार जगतात वावरणारे, पूर्वीचे गुन्हेगार तसेच रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्डवरील हमाल, वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रीया, दारुचे दुकानावरील नौकर रिक्शा किंवा टॅक्सी ड्रायव्हर, पानपट्टीचे दुकानदार, हातगाडीवाले असे लोक चांगले बातमीदार होऊ शकतात. तपासी अंमलदार याने वरील लोकांमधून चांगले बातमीदार तयार करुन त्यांचेशी सतत गुप्त पणे संर्पक ठेवावा. त्यांना दिलेल्या बातमी बद्दलचा मोबदला देऊन गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रयत्न केले पाहिजे. बातमीदाराचे नाव गुप्त ठेवले पाहिजे.

७. संशयिताकडे विचारपूस करण्याची कलाः-

ही एक चांगली कला आहे. व त. अं. चे अंगी असणे आवश्यक आहे. संशयिताकडे विचारपूस करणेच्या अगोदर तपासी अंमलदाराने थोडी पूर्वी तयारी करुन संशयिता बद्दलची व त्याच्या विरुध्द अपलब्ध असलेल्या पुराव्या बद्दलची माहिती करुन घेणे आवश्यक आहे. आणि अशा माहितीचा उपयोग करुन संशयिताला प्रश्न विचारले पाहिजेत. त्याचे बोलण्यात विराधाभास दिसून आल्यास ते त्याच्या नजरेत आणून द्यावे. व त्याचे नैलिम धैर्य कमी करण्याचे प्रयत्न करावेत. त्याने दिलेली माहिती लगेच पताळून पाहिली पाहिजे. त्याने दिलेली माहिती चुकीची असल्यास त्यासंबंधाचा पुरावा याचेसमोर हजर केल्यास गुन्हयाची कबुली देण्याची शक्यता असते. बोलण्याच्या ओघात एखादया बाबतीत त्याचा मानसिक कमकुवतपणा दिसून आल्यास त्याचा आपणा फायदा करुन घेतला पाहिजे. गुन्हेगार कधीही ताबडतोब कबूल होण्याची शक्यता नसते. तरी आपण न कंटाळता किंवा निराश न होता तासनतास त्याचेकडे विचारपूस केली पाहिजे. त्याला सूचक प्रश्न विचारु नयेत. त्यामुळे त्याने केलेल्या गुन्हयाबद्यलची माहिती कळून तो खरा माहिती देण्यास टाळाटाळ करु शकतो.

● ● ●

# गुन्हयाचा तपास

तपासी अंमलदाराने क्रि. प्रो कोडान्वये चालविलेल्या सर्व कामाचा यात समावेश होतो.

यांतः-

१. तोंडी पुरावा.
२. दस्तऐवजी पुरावा.
३. परिस्थितीजन्य पुरावा.

याचा समावेश होतो.

**तपासाचे ध्येयः-** सत्य शोधने - खऱ्या गुन्हेगार व्यक्तीस शोधून काढून त्याचा उपलब्ध पुराव्याचे साहयाने गुन्हयाशी संबंध प्रस्थापित करणे.

तपास करतांना खालील प्रश्नांचा उत्तरे शोधावी त्यानंतरच तपास पूर्ण करतांना सदर गोष्टी लक्षात ठेवाव्यात. खालील प्रमाणे प्रश्न तक्रार देणाऱ्यास विचारावेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गुन्हा कशा प्रकारचा घडला | - | प्रकार |
| २. | गुन्हा कसा घडला | - | पध्दत |
| ३. | गुन्हा कोठे घडला | - | ठिकाण |
| ४. | गुन्हा केंव्हा घडला | - | वेळ |
| ५. | गुन्हा का घडला | - | हेतु |
| ६. | गुन्हा कोणी केला | - | आरोपी |
| ७. | गुन्हा करतांना कोणी पाहिले | - | साक्षीदार |

## तपासाच्या पध्दती

**१. चौकशीः-**

साक्षीदार, संशयित इसम, गुन्हेगार यांना प्रश्न विचारुन त्या आधार माहिती गोळा करणे. सदर व्यक्तीचा पूर्वे इतिहास मिळवून त्यांचे मानसशास्त्र जाणून घ्यावे.

**२. शास्त्रीय उपकरण्यांचा वापर :-**

तपासात मिळणाऱ्या दुव्यांचे शास्राय पध्दतीने पृथःकरण करुन त्याबद्दल योग्य ते मत मिळविण्याकरिता ते योग्य तज्ञांकडे पाठविले जातात.

**३. गुप्त माहिती मिळविण :-**

गुप्त माहिती सहजासहजी माहिती देणारे व संबंध जोडून किंवा पैशांसाठी गुप्त माहिती देणारे यांचे कडून ग ुप्त माहिती मिळवावी लागते.

## तपासाचे टप्पे

१. आरोपी निष्पन्न होणे याकरिता खालील प्रमाणे माहितीचा उपयोग करुन घेता येतो.
   अ. फिर्यादी/साक्षीदारांकडून मिळालेली माहिती.
   ब. गुन्हयाचे ठिकाणी मिळालेले दुवे व त्यांच्या तपासणी निष्कर्षावरुन
   क. गुप्त बातमीदारांकडून मिळविलेली माहिती.

२. आरोपीचा ठावठिकाण काढणे व त्यास अटक करणे.

३. आरोप शाबीतीसाठी पुरावा गोळा करणे :-
   १. चौकशीवरुन
   २. दुव्यावरुन
   ३. लेखी दस्तऐवज

४. मिळविलेला पुरावा नीट गुंफून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करणे.

## निरिक्षण

नुसते पहाणे या क्रियेस निरिक्षण म्हणता येणार नाही. परंतु एखादी गोष्ट चिकित्सक बुध्दीने पहाणे यास निरिक्षण म्हणता येईल.

**निरिक्षणामध्ये प्रामुख्याने :-**

१. आवड २. एकाग्रता **३. पहाण्याचा संवय या तीन घटकांचा समावेश होतो.**

निरिक्षणाचे क्रियेत पहाण्याचा समावेश असतो परंतु पहाण्याच्या क्रियेत निरिक्षण असेलच असे नाही. निरिक्षण ही एक कला आहे. ही कला जो पर्यंत अवगत होत नाही तो पर्यंत तपासी अंमलदार यशस्वी होऊ शकत नाही. याकरिता बुध्दी, कार्यक्षमता, ज्ञान, स्मरणशक्ती या गुणांचा आवश्यकता आहे. या गुणांचा सरावने विकास करता येतो. परंतु त्याकरिता खालील नमूद प्रयत्न

करावेत.

१. हेतुपुर्वक पहाण्याची संवय करणे. वरचेवर पुनरावृत्ती करुन जास्तीत जास्त माहिती मिळविणे.

२. विषयावर जास्तीत जास्त विचार करुन विषयांशी समरस होणे.

३. स्वतःच्या ज्ञानाची चांचणी घेणे.

४. विषयाचा सारांश लक्षात घेणे.

५. विषयाचे वर्गीकरण करणे.

६. वस्तु व परिस्थितीत काय साम्य किंवा विरोधाभास आहे त्याचे तारतम्य ठेवणे.

७. पुन्हां पुन्हां वाचून त्या लिहून काढणे.

८. आकलन शक्ती वाढविणे.

निरिक्षण योग्य झाले तर पुढील अनुमानही योग्य काढता येते. गुन्हयांचे ठिकाणी निरिक्षण करतांना अत्यंत काळजीपुर्वक प्रत्येक वस्तुचे निरिक्षण केले पाहिजे. त्यावरुनच पुढील निर्णय केले पाहिजे. व तपासाची दिशा ठरविता येते त्या निर्णयावर यश मिळते.

**अनुमान :-** निर्णय चुकीचे घेतल्यास तपासात गोंधळ निर्माण होऊन अपयश पदरी पडते. याकरिता निरिक्षण वास्तववादी असले पाहिजे. निरिक्षणामध्ये कल्पनेला वाव देऊ नये. गुन्हेगार काही खुणा, निशाण्या

मागमूस मागे सोडून जातो. त्याला दुबे असे म्हणतात. दुवे शोधून काढणे म्हणजे तपासातील अडचनीवर मात करणे होय. हे दुबे कोठे मिळू शकतात याचे ज्ञाने असले पाहीजे. साधारणपणे गुन्हयाचे ठिकाणी व आसपासच्या परिसराच्या ठिकाणी बारकाईने निरीक्षण दिल्यास दुवे सापडू शकतात.

खालील नमूद ७ ठिकाणी दुवे मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

१. सान्निध्यात येणे.
२. आरोपी/संशयिताचे अंगावर
३. प्रवेश देण्याचे ठिकाण (गुन्हेगारांना)
४. अपराध घडल्याचे ठिकाण-तथील वस्तू
५. गुन्हेगारांचा बाहेर जाण्याचा मार्ग
६. योजिलेल्या स्थळी निघून जाण्याचा मार्ग
७. सावज, बळी जखमी, फिर्यादी यांचे अंगावर

वरील प्रमाणे दुवे मिळण्याकरिता गुन्हयाचे ठिकाणी निरिक्षण करतांना खालील मुद्दे लक्षांत घेतले पाहिजे.

१. तपासी अंमलदाराने स्वच्छ मनाने निरिक्षण केले पाहिजे.

२. खुणा, नशाण्या किंवा माग्र सोडला असल्यास त्याचे बारकाई ने निरिक्षण करावे. व नोंदी घ्याव्यात.

३. स्पष्ट- अस्पष्ट बोटांचे ठसे निरखून पहावेत.

४. पायाचे ठसे मिळाल्यास त्याचे निरिक्षण करावे कारणटोळी मध्ये पुरुषांशिवाय लहान मुले असल्यास प्रसंगी बोध होऊ शकतो.

५. गुन्हयाचे ठिकाणी काही अपरिचित वस्तु सापडल्यास त्या जप्त कराव्यात. त्याचा पुराव्याकामी उपयोग होतो.

६. गुन्हयाचे ठिकाणी मिळालेले सिगारेट, बिडीचे तुकडे, कपडे हत्यारे, रिकामी काडतूस, रक्त, रक्ताने माखलेले कपडे स्फोटक पदार्थ इत्यादी काळजीपूर्वक तपासावेत व तपासकामी जप्त करावेत.

७. गुन्हयाचे जागी बध्या लोकांची गर्दी होऊ देऊ नये. गर्दी झाल्याने मिळणारे दुवे नष्ट होतात.

८. फिर्यादाने दिलेल्या फिर्यादीच्या ओघाने निरिक्षण करावे व आरोपांच्या शोधार्थ दुवा, पुरावा मिळेल हया दृष्टीकोनातून

निरिक्षण करावे:-

९. गुन्हयाच्या ठिकाणाच्या आजुबाजुच्या परिसराचे निरिक्षण करावे. काही वेळा गुन्हेगार गुन्हाकरण्यापूर्वी किंवा गुन्हा केल्यानंतर एकत्र जमतात. त्यांच्या बैठकीच्या ठिकाणी काही दुवे, खुणा किंवा वस्तु मिळण्याची शक्यता असते.

१०. गुन्हयाचे ठिकाणाचा पुराव्याच्या दृष्टीने उपयोग होईल अशा पध्दतीने फोटोग्राफस् घ्यावेत.

११. गुन्हयाचे ठिकाणाचा नकाशा काढावा-

१२. गुन्हेगारांचा पादत्राणे किंवा अन्य वस्तु सापल्यास श्वान पथकास पाचारण करावे. ते येईपर्यंत अशा वस्तु सुरक्षित ठेवाव्यात. कांही वेळा गुन्हेगारांनी घटना स्थळावर हाताळलेल्या वस्तु श्वानपथकाचे शोध कमी उपयुक्त पडू शकतात.

१३. फुटप्रिंट मिळाल्यास त्याचे कास्ट त्वरीत घ्यावेत.

१४. फिंगर प्रिंटस् (हाताच्या बोटांचे ठसे) मिळाल्यास ते सुरक्षित ठेऊन तज्ञांना पाचारण करावे.

### महत्वाचे

एखादी वस्तू किंवा मृत शरीराची ओळख पटेपर्यंत, मोजमाप तसेच छायाचित्रे घेईपर्यंत हया वस्तुस किंवा मृत शरिरास स्पर्श करु नका, स्थिती बदलु नका किंवा त्याच्या स्थितीत फेराफार करु नका.

कारण,

एकदा ती वस्तु किंवा शरीर हलविले गेले तर त्याची प्राथमिक अवस्था पुन्हा प्रस्थापित करता येत नाही.

● ● ●

# भौतिक दुवे गोळा करणे

भौतक दुवा :-

गुन्हेगाराने त्याच्या नकळत त्याने केलेल्या कृत्याचे राहिलेले परीणाम जे तपासी अंमलदारास त्याचे ज्ञान पंचइंद्रियाद्वारे होते व त्याचा तपासात तो पुरावा म्हणून उपयोगात आणतो हया गोष्टीस भौतिक दुवा म्हणतात.

भौतीक दूवे कोणकोणत्या ठिकाणी मिळू शकतात:-

१. गुन्हेगाराचा येण्याचा मार्ग
२. प्रवेश करण्याची जागा
३. गुन्हयाची जागा, आसपासचा परिसर व तेथील वस्तू
४. बाहेर पडण्याची जागा.
५. परत जाण्याचा मार्ग.
६. फिर्यादी किंवा साक्षीदारांचे अंगावर
७. आरोपीचे अंगावर.

भौतीक दुव्यांचा उपयोग :-

तपासात पुरावा मिळविणे व पुराव्यांच्या साखळया जोडणे कमजोर दुवे मजबूत करण्यासाठी अनावश्यक तपासातील बाबी टाळण्याच्यासाठी. गुन्हा व संशयित यांचा संबंध जोडणे व साक्षीदारांची सत्यता पडताळून पाहणे. यासाठी उपयोग होतो.

भौतीक दुवे हाताळतांना व गोळा करतांना लक्षात ठेवण्याचे भौतीक नियम:-

**१. रबरी हातमोजे वापरा.**
**२. वस्तु हाताळण्याची व पहाण्याची अति घाई करु नका.**
**३. परिस्थिती बाबत टिपणी तयार करा.**
**४. गुन्हयाच्या जागेचे सर्वसाधारण व बारीक निरिक्षण करा.**
**५. वस्तू कशी हाताळावी हे ठरवा.**
**६. वस्तू कमीत कमी हाताळा.**

७. नेहमीच्या पध्दतीने वस्तू हाताळू नका. (व्यवहारात नेहमी हाताळतो तशी)

८. हाताळतांना अत्यंत दक्षतेने व काळजीपूर्वक हाताळा. घटनास्थळाचे निरिक्षण करण्याच्या पध्दती:-

(अ) बंद छप्परवजा जागा :-

 १. घडयाळयाच्या काटयाच्या दिशेने.

 २. घडयाळयाच्या काटयाच्या विरुध्द दिशेने.

(ब) मोकळी खुली जागा-

 १. पट्टे पध्दत

 २. विभागणी, जमेन्ल पध्दत.

 ३. चक्राकार(व्हील)पध्दत.

 ४. गोलाकार पध्दत

या पध्दती एका वेळेस एक किंवा संमिश्र वापरता येतात.

**घटनास्थळी आल्यानंतर तपासी अमंलदाराने काय करावे :-**

— -फिर्यादीस सविस्तर विचारपूस व गुन्हा उघडकीस आणण्याची हमी देणे.

— अनावश्यक लोकांना हलविणे व गार्ड नेमणे, कोणतीही वस्तू न हलविणे.

— जागेची पहाणी करुन दुवे सुरक्षित ठेवणे.

— लेखी नोदं, फोटोग्राफ्स झाल्याशिवाय परिस्थीत बदल न करणे.

— अंचूक सूक्ष्म निरिक्षण करुन समक्ष जप्त व सील करणे.

— नकाशा तयार करणे. संबंधित वस्तु/प्रेत इ.ची स्थिती.

— वेगवेगळया कोणातून फोटो घेणे. क्लोज आप्स् इ.

— गुन्हेगारांचे येण्याजाण्याचे मार्ग, एकत्र येण्याची ठिकाणे, वाटणीच्या जागा.

— विशीष्ट प्रकारच्या नोंदी घटनास्थळी आरोपीकडून मलमूत्र विसर्जन, अन्नसेवन, पिणे वगैरे.

— हवामान, जमिनीची स्थिती, गुन्हा कोणत्या परिस्थितीत घटला त्याची जुळवणी.

— प्रकरण दैनादनी (केसडायरी) मध्ये प्रत्येक गोष्टीची नोंद घेणे.

— ताबे पोलीसांना / सहकाऱ्यांना सूचना देऊन डयुटी वाटप करणे.

— आवश्यकते नुसार तज्ञांना पाचारण करणे.

— सविस्तर व मुद्देसूद पंचनामा करणे.

● ● ●

**बातमीदार कसे मिळविता येतील :-**

गुन्हा उघउकीस आणण्यासाठी पोलिस यंत्रणा जितकी उपयुक्त आहे, तितकीच महत्वाची कामगिरी चांगला बातमीदार करु शकतो.

घडलेल्या गुन्हयाची किंवा गुन्हया संबंधीची अगाऊ माहिती मिळाल्याचे गुन्हयास प्रतिशोध करता येतो. अशा कारवाईने पोलिसांची प्रतिमा उजळते. लोकांचा विश्वास कायम रहातो, पोलिस कार्यक्षम कार्यतत्पर आहेत याची जाणीव जनतेस झाल्याने त्यांच्यामध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होते त्याचबरोबर याचा गुन्हेगारी वर्गावर वचक निर्माण होतो. हयाकरीता पोलिस अधिकाऱ्याचे जनतेशी संबंध उत्कृष्ट असले पाहिजेत. जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी त्यांनी परिश्रम, सहनशीलता, कार्यक्षमता, उत्साह या गुणांची जोपासना केली पाहिजे.

व्यवस्थापकाला सर्व दूर हजर रहाणे अशक्य आहे. त्यांना त्याच्या दृष्टीचे आड किंवा इतरत्र काय चालले आहे या करिता बातमीवर अवलंबून रहावेच लागते. एखाद्या घटनेमुळे आपणास त्यांचे परिणाम कळतात परंतु गुप्त बातमीदार यांचे

मार्फतीकऊन त्या घटनेची कारणे तसेच घटनेचे धागेदोरे व त्यांतील बारीक सारीक घटनेचा तपशील समजू शकतो. ज्या प्रमाणे राजकीय घडामोडीच्या संबंधात माहिती मिळविली जाते त्याचप्रमाणे गुन्हेगाराच्या हालचालीबाबत गुन्हया संबंधीची माहिती मिळविणे यांस "क्रिमिनल इन्टेलिजन्स" म्हणतात.

गुन्हेगारांचा माहिती व संभाव्य गुन्हयासंबंधाची माहिती मिळाल्याने गुन्हयास आळा घालता येतो व गुन्हेगारांना पकडता येते. गुन्हे उघडकीस आणण्यापेक्षा गुनहा होऊ न देणे महत्वाचे आहे. त्याकरिता गुन्हेगार जगतामधील हालचालींबद्दल पोलिसांनी सतर्क राहिले पाहिजे. त्याकरिता प्रत्येक पोलिस अंमलदाराने त्याचे गुप्त बातमीदार हेर केले पाहिजेत. त्यासाठी त्यांच्यात त्यांनी विश्वास आत्मविश्वास निर्माण करावयास पाहिजे. त्याकरिता तो अधिकारी अत्यंत कर्तव्यदक्ष व तत्पर असला पाहिजे.

जी बातमी बातमीदारा मार्फत मिळते त्याची पडताळणी, छाननी केली पाहिजे. मिळालेल्या माहितीवरुन ताबडतोब घाईघाईने कारवाई न करता बातमीदारास न कळत याने दिलेल्या माहितीची गुप्त रितीने शहानिशा केली पाहिजे व नंतरच पुढील कारवाई केली पाहिजे. कारण बऱ्याच वेळा शत्रुतवामुळे द्वेष भावनेमुळे दुसऱ्याला त्रास व्हावा या हेतुने, पोलीसांशी आपली मैत्री व्हावी म्हणून किंवा इतर कारणांमुळे खोटी माहिती दिली जाण्याची शक्यता असते.

पोलीसांनी आपला अनुभव व लोकांची ओळख याचा उपयोग करुन विश्वसनीय बातमीदार तयार केले पाहिजेत. कोणत्याही बातमीदाराने बातमी दिल्यानंतर ती निटपणे ऐकून या बातमीवर पोलीसांना सखोल विचार केला पाहिजे.

**बातमीदार कसे मिळविता येतील :-**

१. पोलीसांचा दैंनदिन जीवनात जनतेशी संबंध यो. चांगल्या वाईट कामात पोलीसांना हस्तक्षेप करावा लागतो. सहाजिकच काही लोक पोलिसांच्या आश्रयाची अपेक्षा करतात. तेव्हां ज्या लोकांना कायदेशीर आश्रय पाहिजे असतो अशा लोकांना आपण मदत केल्यास ते पोलिसांचे उपकार मानून त्तयांना मदत करण्यास प्रवृत्त होतात. अशा लोकांमधून चांगले बातमीदार तयार करता येतील.

२. कांही वेळा निरपराध लोकांची गुन्हयात गुंतवणूक होते. त्यांच्या विरुध्द कोर्टातत खटला पाठविणे कायद्याच्या कक्षेच्या बाहेर असते. अशा लोकांशी जवळीक करुन व त्यांना आमिष दाखवून खटल्यातून मुक्त केल्यास ते बातम्या देण्यास स्वेच्छेने तयार होतात.

३. पोलिस स्टेशन अंमलदार या नात्याने आपण लोकांना इतर अन्य प्रकारे कायेदेशीर मदत करुं शकतो. अशा मदततीची परतफेड म्हणून काही लोक बातमीदार होण्यास ततयार होतात.

४. कांही लोकांना कोणी विनाकारण अडचणीत आपणल्यामुळे सूड भावना जागृत होऊन बदला घेण्याची इच्छा निर्माण होते. अशा लोकांना जवळ केल्यास ते उत्स्फूर्तपणे गुन्हेगाराविषयी माहिती देतात. .

५. गुन्हेगारांमध्ये आपसात एकमेकांबद्दल काही कारणास्तव मत्सर निर्माण होतो. तेव्हां या संधीचा पोलिस अंमलदाराने फायदा घेऊन एकमेकांचे विरुध्द बातमीदार म्हणून उपयोग करुन घ्यावा.

६. काही जागरुक नागरिक, समाजसेवक यांचेशी चांगले संबंध प्रस्थापित करुन त्तयांचा उपयोग करुन घेतल्यास हे लोक स्वेच्छेने बातमी देतात.

७. पोलिस अंमलदारांचा समाजातील प्रत्येक थरातील व्यक्तिशी संबंध येतो. या संबंधातून बातमीदार करण्याची कुशलतता पोलिस अंमलदाराकडे असणे आवश्यक आहे.

सर्व थरातील बामीदारांचा ताफा हाती उपलब्ध असला पाहिजे. गुन्हा घडल्यावर बातमीदाराचा ऐन वेळी शोध घेणे व उपयोग करणे हे संयुक्तिक होणार नाही. ऐनवेळी बातमीदार ततयार केल्याने अडचणी निर्माण होतात व बातमीदाराचा पाहिजे तसा चांगला उपयोग होऊ शकत नाही. म्हणून प्रत्येक पोलिस अंमलदाराने ठाण्याची सूत्रे घेतल्यापासूनच बातमीदार मिळविले पाहिजे.

**बातमीदाराजवळ कसे जाल?**

१. त्यांचेशी मित्राप्रमाणे सहानुभूतीपूर्वक वागावे.

२. बातमी क्षुल्लक असली तरी तसे भासवू नका.

३. बातमीदाराची आपणास जरुरी असून त्याचे बातमीवर आपण अवलंबून आहोत असे भासवा.

४. अधिकारी व सामान्य माणूस असा भेद दाखवू नका. अंतर ठेऊ नका. त्याचेशी मिसळून वागा.

५. बातमीदाराची गुप्त भेट घ्या.

६. बातमीदारास योग्य बक्षीस द्या.

७. बातमीदाराचे नाव गुप्तता ठेवा.

८. त्याने दिलेल्या बातमीबाबत त्याची स्तुती करा.

९. बातमीदार खरे किंवा खोटे बोलला तर त्याला दुखवू नका. त्याचा बदला घेऊ नका.

१०. कमीत कमी लोकांत मिसळा.

११. आपल्या चांगल्या वर्तुणुकीने तयास जिंका.

**योग्य बातमी देणारे लोक कोठे मिळतील :-**

बातमीदार दोन प्रकारचे असतात.

१. **हंगामी, नैमित्तीक :-** गुन्हयाचे स्वरुप असेल तसे.

२. **पेरलेले :-** एखादा विशिष्ठ कामासाठी एक विशिष्ठ बातमीदार नेमणे त्यास पेरलेला बातमीदार म्हणता येईल हंगामी बातमीदार स्वेच्छेने बातमी देतात तर पेरलेल्या बातमीदारास कांही मोबदला द्यावा लागतो.

१. सार्वजनिक वाहनांवरील काम करणारे, उदा. रिक्षा, टांगे टॅक्सी ड्रायव्हर, एस.टी. चे चालक, कंडक्टर, ट्रक ड्रायव्हर्स, बोटीवर काम करणारे हवाई सुंदरी इ.

२. हॉटेल मालक, नोकर रेस्टॉरंट टी स्टॉल किराणा दुकानदार पानपट्टीवरील काम करणारे, सावकारी करणारे वगैरे.

३. कुंटनखाना, वेश्या त्याचे एजटं, दारु गु-तेवाले, जुगार अड्डे डान्सींग क्लब इ.

४. दुधवाला, पोस्टमन, न्हावी, पेपरबॉय, मिटर रिडींग घेणारा, दवाखान्यातील स्टॉफ, भाडे वसूल करणारा. इ.

५. रेल्वेगेटमन, टोळीवाले, बस स्टॉफ वरील लोक

६. रेल्वे पोर्टर, रेल्वे रिटायरींग रुमवरील कर्मचारी, वेटींग रुम, वॉचमन, यात्रा, बाजार येथे काम करणारे लोक इ.

७. सिनेमा, सार्वजनिक उद्याने, नाटयगृहे, तमाशा, क्लब, कार पार्किगचे ठिकाणचे लोक आणि ईतर करमणुकीच्या कार्यक्रमाचे ठिकाणी काम करणारे लोक.

८. जेल स्टाफ

९. वयस्क व अक्रियाशील गुन्हेगार

१०. गुप्त रितीने माहिती देणारे स्त्री, पुरुष व मुले

११. निवृत्त पोलिस अधिकारी, कर्मचारी.

**तपासी अंमलदाराच्या अंगी असणारे आवश्यक गुण :-**

तपासी अंमलदाराच्या अंगी गुन्हा उघडकीस आणण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गुणांपैकी चिकाटी, सूक्ष्म निरिक्षण व भौगोलिक परिस्थितीचे ज्ञान या गुणांशिवाय खालील गुण असणे आवश्यक आहे.

**१. कायद्याचे ज्ञान :-**

तपासी अंमलदाराला कायद्याचे चांगले ज्ञान असणे आवश्यक आहे. तयाने कायद्यात होणारे बदल उच्च व सर्वोच्च न्यायालयाने दिलेले महत्वाचे निवाडे याची माहिती करुन घेतली पाहिजे. त्यामुळे आपण जो पुरावा जमा करता तो कायद्याचे दृष्टीने ग्राहय आहे किंवा नाही याची त्याला कल्पना येईल व योग्य प्रकारे पंचनामे, टिपणे लिहिणे व आवश्यक तितकाच पुरावा जमा करणे त्याला शक्य होईल. त्याचप्रमाणे निर्दोष व्यक्तिंना विनाकारण त्रास होणार नाही.

**२. अन्वेषण विज्ञान शास्त्राचे ज्ञान :-**

आजकाल नवीन नवीन शोध लागत असून त्याचा शास्त्रीय तऱ्हेने उपयोग गुन्हे अन्वेषण मधे केला जात आहे. त्या करिता चांगल्या तपासी अंमलदाराला अन्वषण-विज्ञान शास्त्राची मूलभूत तत्वे. तयातील नवीन शोध, त्यांचा गुन्हे अन्वेषणासाठी उपयोग

करण्याची पध्दत वगैरे बाबतची माहिती असणे आवश्यक आहे. त्तयाचप्रमाणे गुन्हयाचे जागी मिळणारे भौतिक द् वे कसें हाताळावे, कोणत्तया तज्ञाकडे पाठवावे व काय मत विचारावे यार्चे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**३. आरोपीकडे व साक्षीदाराकडे विचारपूस करण्याचे कौशल्य :-**

आरोपीकडे व साक्षीदारांकडे योग्य प्रकारे विचारपूस करुन त्यांचे कडून आवश्यक माहिती काढून घेणे ही एक कला आहे. व ही कला त. अं. चे अंगी अङ्गणे आवश्यक आहे. आरोपीता कडे विचारपूस करणे आणि साक्षीदारांकडे विचारप ूस करणे या दोन्ही गोष्टी वेगवेगळया आहेत. त्यांसाठी वेगवेगळया तत्वांचा अवलंब करावा लागतो. आरोपीकडे विचारपूस करतांना उपलब्ध पुराव्याचा उपयोग करुन त्याच्या बोलण्यातील विसंगती त्याच्या नजरेस आणून देऊन काही वेळा शांतपणे तर काही वेळा थोडया कडकपणे वागून त्याचें कडून आवश्यक ती माहिती मिळविली पाहिजे. परंतु साक्षीदाराकडे विचारपूस करततांना, त्यांच्याशी बोलतांना व वागतांना अत्यंत शांतपणे व सभ्यतेने वागले पाहिजे. ते आरोपी नसून आपलयाला तपासात मदतत करणारे आहेतत हे लक्षात ठेवले पाहिजे. वेगवेगळया प्रकारचे साक्षदार यांचा शोध त्तयांचा मानसशास्त्रीय दृष्टया अभ्यास करुन अत्यंत कौशल्याने त्यांचेकडून माहिती मिळविली पाहिजे.

**४. चारित्र्य :-**

पोलिस अधिकाऱ्याला कायद्याने बरेच अधिकार मिळालेले आहेत. समाजातील सर्व थरातील लोकांशी त्यांचे संबंध येतात. त्यांत जुगारी, दारुडे, चोर, वेश्या इ. लोकांश्शीही संबंध येतात. व त्यावेळी त्यांचे जीवनात मोहाचें क्षण य`तात. व त्यावर मात करण्यासाठी त्याचे चारित्र्य चांगले पाहिजे. मोहात न पडता स्वच्छेने व निःपक्षपातीपणे आपला तपास केला पाहिजे.

**५. धैर्य, आमविश्वास, प्रसंगावधान :-**

तपास करीत असतांना, गुन्हेगारांना अटक करतांना साक्षीदारांना तपासततांना,. बडती घेतांना तपासी अंमलदाराला काही वेळा विकट व कठीण प्रसंगांना ततोंड द्यावे लागते. त्यावेळी तयाने आमविश्वासाने, धैयनि· यास तोंड देऊन प्रसंगावधान राखून चातुयनि त्यावर मात केली पाहिजे.

● ● ●

# पहिली खबर

**पहिली खबर म्हणजे काय?**

पहिल्या खबरीची व्याख्या कायद्यात दिलेली नाही. फौजदारी कारवाई दोन प्रकारांनी सुरु करता येते.

१. पोलिसांकडे पहिली खबर देणे. क्र. १५४ क्रि.प्रो. कोड

२. मॅजिस्ट्रेटकडे खाजगी फिर्याद देणे क्र. १९० (१) - " -

**पहिली खबर**

म्हणजे क्रि.प्रो.को. क्र. १५४ अन्वये दिलेली खबर असा अर्थ काढला जातो.

वेळेच्या दृष्टीने सर्वप्रथम पो. ठा. अंमलदार यास दखलपात्र गुन्हयाची जी खबर दिली जो तिला पहिली खबर असे म्हणतात असा गुन्हा पो. ठाण्याचे हद्दी अगर बाहेर घडलेला असेल तरी चालते खबर देणारा हितसंबंधी व्यथित असो अगर परका, असो कोणीही चालतो खबर लेखी अगर तोंडी असूं शकते. तोंडी असल्यास लेखी लिहून घ्यावी कायदेश्शीर बाजू :- क्रि.प्रो.को.क्र. १५४ अन्वये खालील गोष्टी आवश्यक आहे.

**पो. ठाणे अंमलदाराने :-**

१. फिर्यादीने दखलपात्र गुन्हयाची खबर तोंडी दिल्यास लिहून घ्यावी.
२. फिर्यादीस वाचून दाखवावी, सही/आंगठा घ्यावा.
३. नंतर पहिल्या खबरी बुकात नमुन्याप्रमाणे लिहून काढावी.
४. खबरीची नक्कल त्वरीत विनामूल्य फिर्यादीत द्यावी.
५. एक नक्कल संबंधीत मॅजिस्ट्रेट कडे पाठवावी. क्र. १५७ (१)

**पहिली खबर घेतांना पोलिस अंमलदाराने काय लक्षात ठेवावे :-**

१. खबर देणारा घाबरलेला असेल तर त्यास प्रथम दिलासा देऊन शांत करावे व त्यास विश्वासा घेऊन त्याचेकडे घटने बद्दल बारकाईने चौकशी करुन ती माहिती क्रमवार घटनेप्रमाणे जुळणी करावी.

२. दिलेली माहिती सुसूत्र व सविस्तर अशी देणाऱ्याच्या शद्बात व भाषेत सोप्या व स्पष्ट पध्दतीने लिहून घ्यावी.

३. लिहिलेली खबर त्याला वाचून दाखवून बरोबर असल्याची खात्री करावी व त्यास आणखी अधिक काही सांगावयाचे आहे काय, हे विचारावे.

४. त्यानंतर त्याची खबरीवर सही घ्यावी.

५. त्या खबरीची प्रत त्यास विनामूल्य द्यावी.

६. दिलेली खबर प्रथम छापिल नमुन्यात लिहून व त्याची प्रत संबंधित मॅजिस्ट्रेट कडे पाठवावी.

**तरतुदींचा भंग केल्यास काय परिणाम होतो?**

पो. ठाणे अंमलदार याने फिर्याद लिहून घेण्याचे जर नाकारले तर इंडियन पिनल कोड क्र. १६६ प्रमाणे गुन्हा होतो. तसेच फिर्यादीने सही देण्याचे नाकारले तर इं. पि. को. क. १८० प्रमाणे गुन्हा होतो.

पहिल्या खबरीत देणाऱ्या व्यक्तीस खबरी रिपोर्ट हा तपशीलवार येण्याकरिता क्रमवार प्रश्न विचारावेत. त्यात खालील गोष्टी येणे आवश्यक आहे.

१. खबर देणाऱ्या व्यक्तीचे संपूर्ण नाव, वय, धंदा व संपूर्ण व्यक्ती स्वतः फिर्यादी आहे की साक्षीदार.

२. गुन्हा घडल्याचे तारीख, वेळ व ठिकाण.

३. गुन्हयाचे स्वरुप व त्याचे परिणाम.

४. ज्या इसमाविरुध्द गुन्हा घडला तो इसम, आरोपी किंवा तेथे हजर असणाऱ्या व्यक्ती कांही बोलल्या काय? असल्यास त्यांनी वापरलेली भाषा, शद्ब इ.

५. आरोपीचे नांव माहित नसल्यास वर्णन.

६. साक्षीदारांची नांवे माहिती अगर त्यांचे वर्णन.

७. दुखापतीच्या गुन्हयात वापरलेली हत्यारे व वर्णन.

८. आरोपीने गुन्हा करतेवेळी केलेली कृती.

९. मालमत्तेच्या गुन्हयात मालमत्तेचे वर्णन, आकार, वजन, किंमत, ओळखण्याच्या खुणा अगर वैशिष्ठये.

१०. फिर्याद घेतांना नकारात्मक मजकूर टाळावा.

११. फिर्याद उशिरा दिली असल्यास फिर्याद देण्यास लागलेल्या विलंबाची कारणे.

**पहिली खबर किती प्रकारे मिळते :-**

१. फिर्यादी स्वतः पो.स्टे. मध्ये येऊन देतो.

२. पोस्टाने अर्ज करुन

३. पोस्टाने निनावी किंवा खोटी सही करुन.

४. तारेने अगर टेलिफोनने (खात्री केल्यानंतर)

५. स्वतःचे ज्ञानावरुन माहिती गोळा करुन पोलिस अधिकारी फिर्याद देऊ शकतो.

६. आरोपी फिर्याद स्वतः देतो.

वरील पैकी काही प्रसंगी खात्री करुन, चौकशी करुन नंतर सरकार तर्फे पो. अंमलदार यांना पहिली खबर देता येते. मु. पो. म्यॅन्युअल भाग ३ नियम ११३ (६) प्रमाणे काही वेळेस गुन्हा प्रत्यक्ष घडलेला असतो. परंतु नागरिक पुढे येतत नाहीत. अशा वेळी

पोलिसांना माहिती मिळवावी लागते. मु. पो. अ. क्र. ६४ (ब) प्रमाणे नंतर स्वतः सरकारतर्फे फिर्यादी होता येत`.

काही विशिष्ट परिस्थितीत पहिल्या खबरीला पुराव्या चे कायद्यात फार महत्त्व प्राप्त होते. प्रत्यक्ष केस कोर्टात सुरु होण्यास बराच कालावधी जातो. फिर्यादी उलटतो, विसंगत विधाने करतो. काही घटना आठवत नसल्याने साक्षीचे वेळी सांगत नाही. या विविध परिस्थितीत पहिल्या खबरीत महत्तव प्राप्त होते.

क्रि.प्रो.को.क्र. १५४ ची खबर ही समर्पक साक्ष होत नाही. परंतु मर्यादि कारणाकरिता त्याचा उपयोग खालील प्रमाणे होतो.

१. फिर्यादीची वर्तणूक तात्काळ फिर्याद दिली अगर कसे खरेखोटे पणा विशयी कोर्टात अंदाज करता येतो.

२. फिर्यादीतील प्राथमिक भाग अंगीकार म्हणून मान्य असतो.

३. जखमी फिर्यादी नंतर मयत झाल्यास पहिली खबर मृत्युपूर्व जबाब म्हणून ग्राहय असते.

४. मूळ फिर्याद नष्ट झाल्यास दुय्यम पुरावा म्हणून त्या फिर्यादी वरुन कोर्टात पाठविलेली नक्कल, स्टेशन डायरी नोंद, पहिली खबर पुस्तकामधील नक्कल वगैरे ग्राहय असतात.

५. कोर्टात साक्ष देततांना फिर्यादी जर उलटला तर विसंगती दाखविण्याकरितां पहिली खबर वापरता येते.

६. खबर देणाऱ्या इसमाची विश्वासर्हता कमी करण्याकरिता त्याच्या उपयोग करता येतो.

७. फिर्यादीचें जबानीचे समर्थन करण्याकरितां त्याचा उपयोग कोर्टात साक्षीचे कामी होतो.

८. फिर्यादीत साक्ष देतांना सर्वच बारीक सारीक तपशील आठवत नाही अशावेळी आठवण ताजी करण्यासाठी पहिली खबर वाचून दाखविता येते. व नंतर प्रश्न विचारता येतात.

थोडक्यात पुरावा कायदा कलमे ८, २१, ३२(१), ७४-७७, १४५, १५५, १५६-१५९ उपयोगी पडतात.

**पहिली खबर घेतांना काही खास खबरदारी व सुचना :-**

१. पहिली खबर लवकरात लवकर लिहुन घ्यावी. उशीर टाळा म्हणजे संशय वाटणार नाही.

२. साध्या सोप्या भाषेत दया. शक्यतो फिर्यादीचे भाषेत घ्या. मोघम विधाने टाळा.

३. अचुकपणा महत्वाचा आहे. अनावश्यक तपशील टाळा.

४. घटनेची वेळ महत्वाची असते. खेडयात घडयाळाची वेळ देता येत नसल्यास दुपार-दिवस किती इतर सूचक वेळा विचारता येतात.

५. फिर्यादीत खाडाखोड टाळा-जादा मजकूर मागाहून लिहू नका. तसे करणे अशक्यच झाले तर स्वाक्षरी करावी.

६. एकदा पाहिली खबर नोंदल्यानंतर कुठल्याहि परिस्थितीत रद्द होत नाही. त्याबद्दल कायदेशीर विल्हेवाट खालील प्रमाणे.

(अ) तपास नाकारणे, क्रि.प्रो.को.क्र. १५७ (ब)
(ब) दुसऱ्या हद्दीत असल्यास वर्ग करणे.
(क) खटला कोर्टात पाठविणे.
(ड) फायनल रिपोर्ट पाठविणे.
(इ) आरोपीस क्रि.प्रो.को.क्र. १६९ प्रमाणे सोडून देणे

## साक्षीदार

**साक्षीदारांची विचारपूस :-**

साक्षीदारांची विचारपूस, चौकशी व तपासणी हे गुन्हा काय घडला, कोणी केला, कसा केला, कां केला हे सत्य शोधून काढण्यासाठी व त्या घटनेतील गूढ उकलण्यासाठी करावयाची असते.

**प्रश्न विचारण्यापूर्वी कोणत्या गोष्टी पहाव्यात :-**

१. शांतता व एकांन्त जागा

२. तया जागेत टेलिफोन, आकर्षक फोटो, चित्रे वा वस्तू नसाव्यात किंवा मन विचलित करणारे आवाज, संगीत इत्यादि नसावे.

३. गुन्हयाची संपूर्ण माहिती, साक्षीदारांचे पूर्वजीवन व सद्द/परिस्थितीची माहिती.

**साक्षीदारांकडे चौकशी करतांना कोणते मुद्दे लक्षात ठेवावेत?**

१. साक्षीदारास काही कायदेशीर हक्क आहेत याची जाणीव

२. दमदाटी वा प्रलोभन न दाखविणे.

३. विचारपूस करतांना रिव्हाल्वहर, काठी व शक्यतो गणवेष नसावा.

४. विचारपूस करतांना चिडू नये, संतापू नये.

५. साक्षीदारास टोचून, हिणवून बोलू नका. जिभेस आवर घाला.

६. सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक पातळी व त्यातील फरक याची जाणीव ठेवा.

७. त्या माणसाचे चेहऱ्यावर होणारे बदलावर नीट लक्ष ठेवा.

८. त्यांचेशी दोस्ती जमेल असे वर्तन ठेवा.

९. खूप प्रश्न विचारा, उत्तरे घ्या कंटाळा करुन उठू नका.

१०. स्त्रियांचे बाबतीत, सधन आसामी यांचे बाबतीत जास्त वेळ चौकशी विनाकारण लांबवू नका.

११. टेप रेकॉर्डर असल्यास त्याचा उपयोग करा.

**साक्षीदारांचे प्रकार व त्यांना कसे हाताळावे :-**

१. अशिक्षित, साधे, निष्पाप साक्षीदार या साक्षीदारांना त्यांना समजेल अशा साध्या व सोप्या भाषेत छोटे छोटे प्रश्न विचारुन माहिती काढून घ्यावी.

२. खोटे बोलणारे साक्षीदार

खोटे बोलण्याची कारणे

(अ) १. चुकींचे निरीक्षण २. मंदबुध्दी

(ब) १. पक्षपातीपणा २. इतर कारणे जाणून बुजून.

प्रथम हे साक्षीदार खोटे कां बोलतात याची कारणे शोधावीत.

यातील "अ" मधील नमूद कारणांमुळे खोटे बोलत असतील तर त्यांना सहानुभूतीपूर्वक तपासाने व त्यांना आठवण्यासाठी गुन्हयाचे जागी नेणे. तेथील वस्तू, फोटो किंवा इतर लक्षात येण्यासारखी गोष्ट दाखवून किंवा त्या विशिष्ट दिवसाची घटनेची आठवण करुन देणे या मार्गाने तपासावे. यास सहज संबंध पध्दत म्हणतात.

वरील "ब"मध्ये नमूद असलेल्या कारणांमुळे खोटे बोलत असेल तर त्यास भरपूर खोटे बोलूं द्यावे आडकाठी करु नये. वा मध्येच उलटतपासणी न करतां त्याचे सविस्तर निवेदन लिहून घ्यावे. व पुन्हा त्यास तपासावे त्याने दिलेल्या माहितीची शहानिशा करावी त्यावेळी तो ती हकीगत जशीच्या तशी सांगू शकणार नाही. मात्र त्यावेळी त्यात भरपूर प्रश्न विचारुन अत्यंत दक्षतेने पण दृढनिश्चय व कठोरतेने तपासले तर त्याचा खोटेपणा तो गोंधळल्याने उघड होईल त्याचवेळी त्यास खोटया जबानीचे कायदेशीर परिणामांची जाणीव करुन द्यावी.

**३. आढेवेढे घेणारे व टाळाटाळ करणारे साक्षीदार**

हया प्रकारातील साक्षीदार खालील कारणांमुळे साक्ष देण्यास टाळाटाळ करतात.

१. पूर्वी झालेल्या मानसिक, शारिरीक, आर्थिक गैरसोयीमुळे

२. आरोपी किंवा त्याच्या हितचिंतकाकडून होणाऱ्या संभाव्य उपद्रवांमुळे

३. पोलिसांवरील अविश्वास, त्यांचा भ्रष्टाचार, पक्षपातीपणा, पोलिसांबद्दलचा अनादर

४. साक्षीदार आरोपीचा नातेवाईक, स्नेही असल्याने

५. साक्षीदार खुळा कठोर व बेपर्वा वृत्तीचा, भावनाशुन्य असणे.

वरील पैकी कारणे शोधून त्याचे समज गैरसमज दूर करुन त्यांना विश्वासात घेऊन विचारपूस करावी.

**४. बडबडे साक्षीदार**

या लोकांना अवाजवी बडबड करण्याची सवय असते. त्यामुळे चौकशी अंमलदाराने अत्यंत दक्ष रहावे. कांही वेळा ते आत्रस्राव कपोलकल्पित, बनावट हकीगती सांगून तपास चुकीचे मार्गावर जाण्याचा संभव असतो. त्यांना आपणास फक्त गुन्हयाचे मूळ हकीगतीची जरुरी आहे याची जाणीव करुन देऊन विषय सोडून वायफळ बोलूं देऊ नये.

**५. लाजाळू व न्यूनगंड असलेले साक्षीदार**

या लोकांना बोलते करण्यासाठी प्रथम त्यांना खाजगी, वैयक्तिक बाबतीत बोलणे, प्रश्नोत्तर करुन त्यांचा विश्वास संपादन करणे आवश्यक आहे. नंतर त्यांना गुन्हयाचे संबंधित छोटे छोटे हळूवार प्रश्न विचारुन माहिती काढावी. शक्यतो त्यांना त्यांचे परिचित जागी विचारपूस करावी.

**६. बाल साक्षीदार**

हे अत्यंत चांगल्या प्रीचे साक्षीदार असतात. त्यांना प्रश्न समजून ते तर्कशुध्द उत्तरे देतात की नाही याची खात्री करावी. त्यांची निरीक्षण शक्ती व आकलन शक्ती तीक्ष्ण असते व त्यांना अपवाद वगळता कायद्याचे परिणामांची जाणीव नसल्याने ते सत्य सांगून टाकतात. त्यांना छोटे छोटे प्रश्न विचारावेत. मात्रसूचक प्रश्न विचारु नयेत.

**७. स्त्री साक्षीदार :-**

कायद्यातील तरतुदीप्रमाणे दक्षता घेऊन त्यांना तपासावे. शक्यतो त्यांचे घरी जाऊन, नातेवाईकांसमोर तपासावे. दिवसा विचारपूस करावी. अनावश्यक प्रश्न टाळावेत. व्यक्ती म्हणून अवाजवी महत्व देऊ नये. माहिती मिळविण्याचें दृष्टीने तपासावे.

**८. मुके व बहिरे साक्षीदार :-**

या प्रकारचे साक्षीदार फार चांगली निरिक्षण शक्ती, संवेदन क्षमता असलेले असतात. त्यांची ऐकणे व बोलणे यातील असमर्थता ही संवेदनक्षमता व सूक्ष्म-निरिक्षण व आकलन-शक्ती यात भरपाई करुन जातात. हा अनुभव आहे. त्यांना प्रश्न विचारणे फार अवघड असते. सुशिक्षित असला तर लेखी, टायपिंग या व्दारे तपासता येतात. पण इतरांचे बाबतीत त्यांच्या माता, पिता, भाऊ, बहिण, मित्र, आप्तेष्ट, यांना त्यांच्या खुणांचे स्पष्टीकरण करण्यांत मध्यस्थ म्हणून घ्यावे लागते. या बाबतच्या सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थाकडून मदत मिळू शकते.

**९. फितुर साक्षीदार :-**

## गुन्हा उघडकीस आणण्यासाठी तपासी अंमलदाराने (डिटेक्टीव्हने) काय कारवाई करावी :-

गुन्हयाचा प्रकार ज्याप्रमाणे असेल त्याला अनुसरुन कारवाई करणें उचीत ठरेल. तथापी गुन्हा उघडकीस आणण्यासाठी खालील प्रमाणे कारवाई करावी व सर्वतो प्रामाणिक प्रयत्न करावेत.

१. गुन्हा घडल्याची खबर मिळताच गुन्हयाचे जागी जाऊन अपराधाचे स्वरुपाची माहिती करुन घ्यावी.

२. पो. स्टेशन मध्ये उपलब्ध असलेले क्राईम रेकॉर्ड पाहून गुन्हयाच्या पध्दतीच अवलोकन करावे.

३. चोरीस गेलेल्या मालमत्तेसंबंधी माहिती करुन घेऊन संभाव्य गुन्हेगार कोण असावे याचें अनुमान काढा.

४. अपराध घडलेल्या ठिकाणचे व आजुबाजूच्या परिसराचे सूक्ष्म निरिक्षण करावे. त्या ठिकाणाचे बोटांचे ठसे, गुन्हेगाराची एखादी वस्तू किंवा उपयुक्त असा एखादा दुवा मिळतो अगर कसे हे बारकाईने पहावे.

५. अपराधाचे स्वरुप लक्षात घेऊन अंगुलीमुद्रा, तज्ञ, श्वानपथक, हस्तातरतज्ञ, वैज्ञानिक तज्ञ, वैद्यकीय तज्ञ, यांना पाचारण करावे.

६. फोटोग्राफरला बोलावून गुन्हयाच्या ठिकाणच्या व उपलब्ध दुव्याचा फोटो काढावा.

७. जलद गतीन कार्यास चालना द्यावी. सुसज्ज यंत्रणेव्दारे गुन्हेगार व चोरीस गेलेल्या मालाचा शोध घ्यावा.

८. माहित असलेल्या गुन्हेगारांच्या घरावर छापा घालावा पाळत ठेवावी.

९. चोरीचा माल घेणारे इसमांचे घरावर पाळत ठेऊन छापा घालावा.

१०. योग्य बातमीदाराचा उपयोग करुन गुन्हेगारासंबंधी माहिती मिळवावी.

११. शेजारील, नजीकचे पोलीस ठाण्याची संपर्क साधून गुन्हयासंबंधी ची आरोपीची माहिती देऊन त्यांचे हद्दीत शोध घेण्यास सांगावे.

१२. गुन्हेगारांचे अड्डे लपण्याची ठिकाणे, धर्मशाळा, रेल्वे स्टेशन एस.टी.स्टॅन्ड, टॅक्सी स्टॅन्ड, दारुचे गुप्ते, जुगाराचे अड्डे वेशांची घरे, ओसाड प्रदेश, लॉजिंग-बोर्डींग येथे चेकींग करावी व प्रसंगानुसार छापे घालावे.

१३. गुन्हेगारांना आश्रय देणारे, त्यांच्या घरांवर पाळत ठेऊन परिस्थितीनुसार छापे घालावेत.

१४. गुन्हा करतांना वाहनाचा वापर केला असेल तर वाहनाचा शोध घ्यावा व वाहन ताब्यात घ्यावे.

१५. एकाच वेळी निरनिराळया पार्टया नेमुन निरनिराळया ठिकाणी छापे घालावे व झडत्या घ्याव्यात. त्यामुळे गुन्हेगाराला पळून जाण्याची संधी तसेच चोरलेल्या मालाची विल्हेवाट लावण्यास सवड मिळणार नाही.

**रेकॉर्डवरुन गुन्हेगाराची माहिती कोठे मिळेल :-**

१. क्रिमीनल इंटेलिजन्स गैझेट

२. गुन्हेगाराचे वर्गीकरण व पोलीस रेकॉर्ड

३. एम. ओ.बी, व सी. आय.डी. क्राईम १ ते ४ रेकॉर्ड

४. व्हिलेज क्राईम नाटेबुक

५. पोलीस पाटलाचे रेकॉर्ड

६. पोलीस गेझेट

७. सराईत गुन्हेगाराचे अ टोल, ब रेल्वे, संमणक यंत्र

**गुप्त तऱ्हेने किंवा वेशांतर करुन गुन्हया संबंधाची माहिती काढणे.**

(अ) गुन्हयाचा तपास करतांना काही संघटीत गुन्हेगाराची माहिती काढणे अत्यंत अडचणीचे असते. वेषांतर करुन त्या टोळीची माहिती काढणे अत्यंत जोखमीचे काम आहे. पोलीस अधिकारी, किंवा त्याने एखाद्या व्यक्तीची या कामी नियुक्ती करण्यापूर्वी संघटीत गुन्हेगारांच्या टोळीची संपूर्ण माहिती व अभ्यास करावयास पाहिजे. टोळीतील लोक कोणत्या जाती धर्माचे आहेत, त्यांच्या चाली रुढी काय आहेत त्यांच्या भाषा, पेहेराव काय आहे, या सर्व गोष्टींची प्रथम सखोल अभ्यास करुन मग तया टोळीत प्रवेश मिळविला पाहिजे. वरील सर्व गोष्टीची जाणीव पोलिस अधिकाऱ्यास असायला पाहिजे. म्हणजे भाषा, पेहेराव चाली रुढीच्या, अडचणी येणार नाहीत त्या पोलीस अधिकाऱ्याला (कर्मचाऱ्याला) ज्या भागात नेमण्यांत आलेले आहे त्या भागाची संपूर्ण माहिती असावयाला हवी पण तो त्या भागांतील रहाणारा नसावा. नाहीतर तो पोलीस आहे हे सर्वांना माहित होईल.

पोलीस कर्मचारी वेषांतर करुन नेमला त्याच वेळेपासून त्याने आपण पोलीस आहोत ही भावना गुप्त ठेवायला पाहिजे. टोळीच्या हालचाली कळविण्यासाठी काही सांकेतिक भाषा ठेवावयास पाहिजे. संदेश पाठविण्यासाठी कोरीएट पध्दत अवलंबली पाहिजे. नांव बदलले पाहिजे ज्या टोळीत रहावयाचे आहे त्यांच्या सर्व पध्दती अवलंबिल्या पाहिजेत ज्यामुळे टोळीतील लोकांना वेषांतरीत इसमाबद्दल शंका यायला नको. टोळीत तो जितका समरस होईल तितके अधिक फायदे पोलीस कर्तव्यांत होतील.

(ब) काही वेळा उघडकीस न आलेल्या खुनाच्या तपासासाठी देखील वेषांतर कामे जरुरचे असते. ज्या ठिकाणी खून झालेला इसम, किंवा संशयीत रहात असेल किंवा ज्या ठिकाणी खून झालेल्या इसमाचा उद्योग-व्यवसाय असेल अशा भागात एक हुशार अधिकारी वेषांतर करुन पाठविला जातो तो त्या ठिकाणी एकदा धंदा सुरु करण्याच्या निमित्ताने किंवा अन्य रुपात जाऊन तेथील जनतेत एकरुप होतो व गुप्त रितीने जाऊन तेथील खुनाची माहिती काढुं शकतो. अशा प्रकारची माहिती

त्या भागांतील एखाद्या दुकानांत नेहमी गिऱ्हाईके म्हणून जाऊन, दुकानदाराशी मैत्री वाढवून सुध्दा काढता येते. पण यासाठी नेमलेला अधिकारी अत्यंत हुशार, चलाख, धीरदेत्ता व चांगल्या प्रकारे वेषांतर करुन आपली ओळख पदू न देणारा असला पाहिजे.

(क) काळाबाजार करणारे, चोरटी आयात करणारे, दारु, हत्यारे आंमली पदार्थ यांचा व्यापार करणारे, बनावट जाली चलनी नोटा तयार करणारे, स्त्रियांची गैरफायदा विक्री करणारे गुन्हेगार हे आपला व्यवसाय अत्यंत गुप्त रितीने करित असतात व त्यांचेकडे फक्त नेहमी ठराविक गिऱ्हाईकांना प्रवेश मिळतो. अशा गुन्हेगाराची माहिती काढण्यासापठी पोलिसांना वेषांतराचा फार फायदा होतो. या साठी पोलीस अधिकाऱ्याने वेषांतर करुन अशा गुन्हेगारांच्या एजंटामार्फत काही काळ व्यवसायाचा बहाणा करुन त्यांचा विश्वास संपादन केला पाहिजे. व हळुहळु त्या टोळी संबंधाने माहिती मिळविली पाहिजे. या कामी घाई गडबड करता कामाचे (उपयोगाचे) नाही.

(ड) लांच लुचपतीच्या गुन्हयामध्ये सापळा लावतांना पोलिस अधिकाऱ्यांनी वेषांतर करुन आजुबाजूला उपस्थित राहिले पाहिजे. अन्यथा सावज सावध होऊन सांपळा असफल होण्याची शक्यता असते तसेच लांचलुचपतीच्या गुन्हयामध्ये आरोपाच्या उत्पन्नापेक्षा अधिक असलेल्या मालमत्तेसंबंधी माहिती काढण्यासाठी सुध्दा वेषांतराचा उपयोग होतो.

**वेषांतर करुन बातमी काढणाऱ्या अधिकाऱ्याच्या अंगी कोणते गुण असावे :-**

१. तो उत्तम तपासी अंमलदार आणि अंगी अभिनय कला असणारा असला पाहिजे.

२. तो ज्या वातावरणांत काम करणार आहे त्या वातावरणाशी समरस झाला पाहिजे. ज्या जातीच्या टोळया असतील त्यांच्या प्रमाणे बोलणे. वागणे व समाजांत त्या लोकांची जी श्रेणी असेल त्यानुसार विचार सरणी ठेवली पाहिजे.

३. ज्या कामगीरी साठी नेमले आहे त्याची जाणीव प्रत्येक क्षणी मनोमनी असावयास पाहिजे.

४. शांत, मनोवृत्ती, खंबीर, आत्मविश्वास उत्तम निरिक्षण, चांगल्या प्रकारची आकलन शक्ती व योग्य निर्णय घेण्याची पात्रता पाहिजे.

५. चांगल्या वाईट परिस्थितीतुन हुशारीने व संयमाने काम करण्याची पात्रता पाहिजे.

६. प्रकृती निकोप, असावी बोलणे न विचार करणे संशयास्पद नसावे.

७. दिलेली कामगिरी अक्कल हुशारीने, आपला हेतु उघडकीस येवू न देता तसेच स्वतःला उघड होऊ न देता करणे महत्वाचे आहे.

**७. संशयितांचा पाठलाग**

शाडोईंग् म्हणजे गुन्हेगाराच्या संशयीताच्या पाळतीवर मागे त्याच्या सावली प्रमाणे रहाणे.

पाठलाग हा पोलीस कार्य यशस्वीने व परिणामकारक होण्यासाठी एक महत्वाचा भाग आहे.

पाठलाग हे कार्य अत्यंत नाजूक व सफाईदार वृततीचे आहे. त्या साठी त्याला धीर, आवड व कार्यक्षमता पाहिजे.

पाठलाग हा सर्व्हेलनाचा एक भाग आहे. त्याचे प्रामुख्याने दोन भाग आहेत.

१. खुली नजर ठेवणे.

२. गुप्त रितीने नजर ठेवणे.

१. **क्लोज टेळ :-** यांत ज्या माणसाच्या हालचालीवर नजर ठेवायची आहे त्याची दिवसांतील प्रत्येक क्षणाची कृती, हालचाल याची नोंद ठेवणे. प्रत्येक क्षणाच्या हालचालीवर नजर ठेवणे हे अत्यंतर धोकेदायक व कष्टांचे काम आहे. यांत जरुरी प्रमाणे दोन किंवा जादा इसम नेमाचे लागातात. त्यांत नजर ठेवणारा लवकर उघडकीस येण्याचा संभव असतो. किंवा सावज नजरेआड होऊन गायब होण्याचा संभव असतो.

२. **लूज टेळ :-** यात सावज व्यक्तीच्या काही विविक्षीत काळा पुरती किंवा जागेवर त्याच्या हालचालीवर नजर ठेवली जाते.

**शाडोइंग :-** पाठलाग हा खालील व्यक्तीच्या बाबतीत उपयोगात आणावा.

१. काही अपराध केल्याचा संशय आलेल्या व्यक्ती

२. काही व्यक्ती ज्या गुन्हेगारी क्षेत्रात काम करतात किंवा त्यांचा त्यांत सहभाग आहे, असा संशय आहे अशा व्यक्ती,

३. ज्या व्यक्तीशी फरारी किंवा पाहिजे असलेला गुन्हेगार संपर्क ठेवण्यांना संभव आहे अशी व्यक्ती.

४. समाज विघातक कृत्ये करणाऱ्या किंवा पडद्याआडून अशा कृत्यांना मदत करण्याचा राजकीय व जातीय प्रवृत्तीच्या व्यक्ती.

**नजर ठेवण्याचे उद्देश :-**

१. एखाद्या माणसाची वर्तणुक व व्यवसाय या बाबत माहिती समजण्यासाठी.

२. फरारी किंवा वॉन्टेड इसमाचा शोध लावणे.

३. गुन्हेगाराची गुप्त आश्रयस्थाने शोधणे.

४. चोरीची मालमत्ता, बनावट नाणी व चलने इत्यादींचा शोध किंवा त्याचा पुरावा शोधण्यासाठी.

५. आरोपाचे सहकारी किंवा साक्षीदार शोधण्यासाठी.

६. प्रतिबंधात्मक कारवाई पुरावा मिळविणे.

७. झडतीचे वारंट मिळविण्याकरिता मिळविण्यासाठी

८. संशयीताची विचारपूस करण्यासाठी माहिती गोळा करणे.

**पाठलाग करून नजर ठेवणाऱ्याचें अंगी आवश्यक गुणः-**

१. सामान्य हावभाव व हालचाली.

२. चिकाटी

३. अमर्याद शक्ती व सावधगीरी.

४. सूक्ष्म निरिक्षण शक्ती असलेला.

५. हिकमती-युक्तीबाज.

६. अदृष्य होण्याची किमया.

७. हा मनुष्य अति बडबडया नसावा, तो मितभाषणी असावा.

८. योग्य निर्णय शक्ती.

९. भाषेची देणगी.

१०. कसलेला अभिनय पटू

११. तीव्र स्मरणशक्ती.

१२. धैर्यता

१३. मानसशास्त्राचे ज्ञान.

१४. चांगला व्यवहार, ज्ञानी व अचूक अंदाज करणारा.

१५. गुन्हा प्रकटीकरणाचे ज्ञान.

१६. सहनशक्ती.

१७. धडधाकट प्रकृती.

१८. निश्चयी व इच्छाशक्ती.

**पाठलाग करण्यासाठी मार्गदर्शक सूचना :-**

१. काम सुरु करण्यापूर्वी आपले दैनंदिन विधी पूर्ण करा.

२. तेथील वातावरणास व परिस्थितीनुरुप लागणारा पोषाख घाला.

३. स्वतःजवळ खाद्य-पदार्थ, सिगारेट विटी याचा पुरेसा स्टॉक जवळ ठेवा.

४. टॅक्सी, बस टेलिफोन साठी योग्य सुटी नाणी (चिल्लर)जवळ ठेवा.

५. त्या व्यक्तीवर अगदी डोळे रोखून पाहू नका त्याने तुमच्याकडे पाहिले, किंवा ओळख दाखविली तर भांबाऊ नका.

६. तुमची हालचाल नैसर्गीक व स्वाभाविक असावी.

७. त्या व्यक्तीच्या समोरा समोर न येता त्यांच्यात व तुमच्यात अंतर ठेवा.

८. स्वतःकडे लक्ष न वेधून घेता सूक्ष्म निरिक्षण करा.

९. तुमचा खोळंबा होईल अशा कोणत्याही गोष्टीत स्वतः ला गुंतवू नका.

१०. स्थानिक भाषेची योग्य माहिती करुन घ्या व प्राप्त परिस्थितीत योग्य उच्चाराची लकब ठेवा.

११. आपल्या जवळ ओळख पत्र ठेवू नका. वरिष्ठ अधिकाऱ्याना सॅल्यूट (सलाम) करुं नका, आणि तुमच्या सहकार्यांना टाळा नाहीतर हया मुळे तुमची ओळख सावजास पटेल.

१२. तुमच्यावर सुध्दा नजर असते हे लक्षांत ठेवून कोणत्याही सापळयांत सांपडू नका.

१३. तुम्हास जरी वाटले की तुम्ही ओळखले गेला आहात तरी हताश झाला हे दाखवू नका. किंवा भांबावून जाऊ नका. चालतया बस मधून किंवा आगगाडीतून उडी घेऊ नका. आपण चालविलेला पाठलाग हा सामान्य व नैसर्गिक आहे. असे हुशारीने वागुन चला. उदा. हॉटेल मध्ये शिरणे.

**७. गुन्हयाच्या रेकॉर्डवरुन माहिती घेणे.**

क्राईम रेकॉर्ड म्हणजे ज्यात गुन्हे व गुन्हेगारासंबंधी माहिती उपलब्ध असते ते दस्तऐवज. या वरुन सराईत गुन्हेगार त्यांच्या पध्दती कार्यक्षेत्र इत्यादी माहिती मिळु शकते. सदरचे रेकॉर्ड खालील प्रमाणे ठेवले जाते.

१. स्थानिक,

२. जिल्हावार

३. राज्य पातळी

४. राष्ट्र पातळी व आंतरराष्ट्र पातळी.

**१. स्थानिक रेकॉर्ड :-**

१. पहिली खबर २. क्राहिम रजिस्टर ३. केसडायरी ४. अपराध शाबीतीचे रजिस्टर ५. माहितगार गुन्हेगाराचे रजिस्टर ६. सर्व्हेलन्स रजिस्टर व हिस्ट्रीशटिस ७. भटक्या व गुन्हेगारांचे रजिस्टर ८. क्राईम चार्ट ९. गाववारी गुन्हे रजिस्टर १०. गुन्हे शाबीत नसलेले पण न्यायाधिन असलेल्या गुन्हयांतील गुन्हेगार इत्यादि.

**२. जिल्हा पातळी :-**

१. गुन्हे व त्याचे प्रमाण व पीडित भागाचे ओळख नकाशे

२. गुन्हयांचे नकाशे गुन्हेवार

३. फरारी रजिस्टर

४. टोळयांचे रजिस्टर •

५. कोर्टात अनोळखी गुन्हेगारांचे रजिस्टर

६. जेलमधून सुटलेले गुन्हेगार यांचे रजिस्टर इत्यादि.

**३. राज्य पातळी :-**

१. गुन्हे कार्यप्रणाली केंद्राची रजिस्टरे

२. सराईत व गुन्हेगारांची माहिती देणारी रजिस्टरे

३. अंगुली मुद्रा केंद्र रेकॉर्ड

४. छायाचित्र ब्युरो

५. इन्डेक्स कार्ड

६. कॉम्पुटर रेकॉर्ड

या रजिस्टर यांचेवरुन अनेकदा गुन्हेगारांची माहिती मिळून गुन्हेगार उजेडात येतो व तो गुन्हा प्रकट करता येतो.

## कोर्टात साक्ष देणे

गुन्हयाचा तपास पूर्ण झाल्यानंतर कोर्टात खटला पाठवल्यानंतर तपासी अंमलदारास कोर्टात पुरावा सादर करावा लागतो. केलेल्या तपासा संदर्भात समक्ष हजर राहून साक्ष द्यावी लागते. सर्व महत्वाच्या खटल्यात पोलीस अंमलदाराने प्रारंभपासून हजर रहावे. कोर्टात केस डायरी न्यावी. त्या अगोदर पेट्रोलबुक, नोटबुक, स्टेशन डायरी इ. मध्ये त्या घटनेबद्दल काय नोंदी केल्या आहेत याची खात्री करावी. आदल्या दिवशी सरकारी वकिलाची भेट घ्यावी व त्यांच्याशी खटल्यबद्दल कोणकोणते मुद्दे मांडले जाणार आहेत, त्या मुद्यांवर कोणते साक्षीदार आहेत, कोणते कागदपत्र हजर करणार आहेत. याबाबत चर्चा करावी. केसडायरीचे कागदपत्रांचा अभ्यास करावा.

**कोर्टात साक्ष कशी याची बाबत सूचना :-**

१. साक्ष देण्यासाठी नेहमी गणवेषात जावे. गणवेष स्वच्छ व नीट असावा. काही वेळा निलंबित असणे इ. कारणांनी गणवेष घालणे शक्य नसते, त्यावेळी सरकारी वकीलामार्फत ती ती गोष्ट अगोदर कोर्टात कळवावी. गुप्तचर खात्यातील लोकांना गणवेष घालणे आवश्यक नसते. मात्र त्यांनी जवळ ओळखपत्र ठेवावे.

२. साक्षीचे पिंजऱ्यात असतांना व बाहेर पडतांना कोर्टास सॅल्युट करावा.

३. साक्ष देतांना सरकारी वकील व आरोपीचे वकील, कोर्टाचे प्रश्न काळजीपुर्वक समजून त्यांची नीट उत्तरे द्यावीत. प्रश्न न समजल्यास, कोर्टास अगर सरकारी वकीलास तसें सांगून तो समजावून त्यांचे उत्तर द्यावे. प्रश्न न समजता घाईघाईने उत्तरे देऊ नयेत. तसेच उत्तर देण्यास फार विलंब लावू नये. कोर्ट त्याची नोंद घेऊ शकते.

४. विरुध्द पक्षाचे वकील उलटसुलट प्रश्न विचारण्याची शक्यता असते. त्यावेळी शांत वृत्तीने समर्पक उत्तरे द्यावीत. त्यामुळे विनाकारण चिडून जाऊ नये. उध्दटपणे उत्तरे देऊ नयेत.

५. साक्ष देतांना इकडे तिकडे न पहाता नजर कोर्टाकडे ठेवावी.

६. प्रत्येक प्रश्नाचे विचारपूर्वक उत्तर द्यावे. संदिग्ध व दुहेरी प्रश्न असल्यास व त्यामुळे मनात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न असेल तर प्रश्नांची फोड करण्यास किंवा प्रश्न स्पष्ट करण्याची वकिलांना विनंती करावी.

७. प्रश्नांचे उत्तर प्रतिप्रश्नाने देऊ नये.

८. ज्या प्रश्नाचे उत्तर आठवत नसेल किंवा निश्चित माहित नसेल तर उत्तरे अविचाराने देऊ नयेत. किंवा चुकीची उत्तरे देऊ नयेत. आठवत नाही असे सरळ सांगावे.

९. उत्तरे देतांना मोजक्या शब्दात द्यावी. होय किंवा नाही अशा व साध्या शब्दात द्यावीत. आवश्यक तेथे पूर्ण उत्तरे द्यावे. तुमच्या मते एखाद्या गोष्टीचा खुलासा करणे आवश्यक असल्यास साक्ष संपल्यावर कोर्टाचे परवानगीने त्यांना सांगाव्यात.

१०. तुम्हास प्रत्यक्ष माहिती असलेली माहिती असलेली माहिती सांगावी. त्याबाबत सांगीव, ऐकीव माहितीवर आधारीत सांगू नये.

११. प्रश्न चालू खटल्याशी संबंधित नाही व बदनामीकारक आहे असे वाटल्यास व त्याचे उत्तर दिल्याने स्वतःवर आरोप येईल अशा प्रश्नांची उत्तरे देण्याअगोदर कोर्टाचे संरक्षण मागावे दुसऱ्याची बदनामी होईल अशी विधाने करुं नये.

१२. साक्ष चालू असतांना केस डायरी पाहण्याचे जास्तीत जास्त टाळावे. कारण तपासी अंमलदाराने केसडायरी पाहिल्यास आरोपीच्या वकीलांना ती पहाण्याचा हक्क मिळतो. व त्यामुळे उलट तपासणी वाढण्याची शक्यता असते. म्हणून साक्ष सुरु होण्यापूर्वीच केस डायरी काळजीपूर्वक वाचून काढावी आवश्यक वाटल्यास केस डायरीतील महत्वाचे मुद्दे एका कागदावर लिहून घेऊन तो कागद बरोबर ठेवावा व जरुर तेंव्हा त्याचा उपयोग करावा.

१३. मिळालेली गुप्त माहिती कोणाकडून मिळाली त्याचे नांव सांगणे बंधनकारक नाही. हे लक्षांत ठेवा.

१४. सरकारी कामकाजामधील अप्रसिध्द रेकॉर्डबद्दल संबंधित खात्याचे प्रमुखाकडून परवानगी शिवाय त्याबाबत साक्ष देता येणार नाही. तसेच गुप्त पत्रव्यवहाराबाबतही साक्ष देण्याची मनाई आहे. त्याबाबत सरकारी वकीलाशी सल्ला मसलत करुन साक्ष द्यावी.

१५. साक्ष देण्यापूर्वी व दिल्यानंतर विरुध्द वकीलांशी केस संबंधी चर्चा करु नये.

१६. कोर्टाची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय आवार सोडू नये. तसेच साक्ष संपल्यावर कोर्ट हॉल परवानगीनेच सोडावा.

**पंचनामे तयार करणे :-**

**गुन्हयाचे ठिकाणचा पंचनामा :-**

१. गुन्हयांचे ठिकाणाचे सविस्तर बिनचूक वर्णन.

२. हुबेहुब चित्र उभे राहिले पाहिजे.

३. सुक्ष्म निरिक्षणानंतर योजनाबध्द आराखडा तयार करणे वर्णन गुन्हयाचे स्वरुपावर अवलंबून.

**सर्वसाधारण नियम :-** भाषाशैलीला महत्व नसून त्यात :-

१. तर्कशुध्दता २. सुसंगतपणा ३. तंतोतंतपणा या गोष्टींना महत्व आहे.

**कायदेशीर जबाबदारी :-**

(अ)(४)व क.२ (प) वर आधारीत जागा. उदा. इमारत तंबू यांची झडतीसाठी मृत शरीराचा पंचनामा क. १७४ क्रि. प्रो. कोड.

**वरील कामी पंचांना बोलावण्याचा अधिकार :-**

अनुक्रमे :- क. १०० (४)व क. १७५(१)प्रमाणे. नाकारल्यास (अ)१०० (८)व सी.आर.पी. सी. १००(८) (ब) सी.आर. पी.सी. कलम. १७४ प्रमाणे कारवाई.

दक्षता :- पंचासमक्ष जागेवरच करुन सहया घेणे.

२. खाडाखोड, गिरविणे टाळणे.

३. एकच शाही व हस्ताक्षर. नंतर फेरफार न करणे.

४. वास्तववादी वर्णन.

५. प्रेताचे मरणाचे व जखमेच्या कारणाचे, मत सोडून इतर बाबतीत पंचांची मते लिहू नका.

६. फूलस्केप कागद वापरा, मार्जिन सोडा, नंबर द्या.

**पंच कोणास निवडावे:-**

१. हुशार, अब्रुदार, बोलका, सुशिक्षित, निःपक्षपाती.

२. पूर्वशिक्षा, पोलिस प्रकरणात गुंतलेला नसावा.

३. धर्म, शारीरिक पीडा, रोग, व्यंग यामुळे आक्षेपार्ह नसावा.

४. गुन्हयाशी संबंधित नसावा. (आरोपी, फिर्यादी, किंवा त्याचेशी संबंधित)

५. स्त्रियाचे बाबती स्त्री-पंच आवश्यक.

६. नाराज व्यक्तीस शक्यतोवर घेऊ नये.

७. शक्यतो घटना स्थळाजवळील रहाणारा ठिक. धंदेवाईक नसावा.

८. वस्तुची पारख करावयाची असल्यास तयाबाबत पारख करणारा असावा. उदा. सोने चांदी वगैरे.

**वर्णन करण्यासाठी महत्वाच्या सूचना :-**

१. ठिकाणाचा नकाशा.

२. जागेचे वर्णन, बंद मोकळी, घर, शेत, पटांगण व त्याच्या चतुःसिमा.

३. गुन्हयाच्या परिस्थितीचे जप्त वस्तुचे वर्णनः- बारीक-सारीक गोष्टींचे उल्लेख.

४. फेरफार झाल्यास त्याची खात्री व नोंद.

५. घाई गर्दी करु नका. वर्णन- मुद्देसूद, सविस्तर, बिनचूक व सूक्ष्मबध्द असावे. मोजमाप, अचूक असावे. उदा. इंच, फूट इ.

६. जवळच, लगतच, पुढे-मागे, थोडे खाली, त्याच्या थोडयावरती असे नसावे..डाव्या उजव्या बाजूस असे शब्द वापरु नका.

**अपवाद :-**

प्रेताचा उजवा हात, नदीचा डावा तीर इ.

स्थिर बिंदू घेऊन अंतर मोजावे. (अस्थिर जंगल वस्तुचे अनुरोधाने)

दुवे :-

जप्ती - ताब्यात घेणे (योग्य-रितीने)

सर्व असाधारण गौण, किरकोळ, स्वरुपाच्या गोष्टींची नोंद घ्यावी.

● ● ●

# प्रेताचे पंचनामे व प्रेत उकरणे

**प्रेताचा पंचनामा (इन्क्वेस्ट)**

अनैसर्गिक व संशयास्पद मृत्युच्या कारणांचा तपास (शोध) लावण्याच्या कायदेशीर व न्यायालयीन चौकशीस इन्क्वेस्ट असे म्हणतात. हे अधिकार पोलिसांना व मॅजिस्ट्रेटला क्रि. प्रो. पोड कलम १७४ प्रमाणे देण्यात आलेले आहेत.

मुंबई शहारात तो अधिकार कारोनटला दिलेला आहे.

बिनहत्यारी पोलिस हवालदारांना हा अधिकार महाराष्ट्रात सहकारी फतवा आदेश क्रं १४५९ -४७४३१, दिनांक ३०/१२/१९६१ प्रमांणे दिला आहे. कैदेतील मृत्युंचे बाबतीत तो अधिकार जवळच्या मॅजिस्ट्रेटला द्यावा. उदा. उपविभागीय दंडाधिकारी वगैरे. आपण चौकशी करु नये.

**इन्क्वेस्ट करतांना कोणत्या बाबीकंडे विशेष लक्ष द्यावे**

१. पंच घटनास्थळी येईपावेतो प्रेताची स्थिती बदलू नका व कोणासही हात लाऊ देऊ नका.

२. प्रेतांचे फोटो किंवा त्या स्थितीचे टाचण घेतल्याशिवाय स्थिती बदलू नका.

३. पंचासमक्ष विहीरीत मिळालेले प्रेत वर काढून घ्याचे व टांगलेले प्रेत खाली उतरवून घ्यावे.

४. प्रेताची सर्वागाची दोन्ही बाजुनी उलट सुलट अत्यंत बारकाईने व काळजीपूर्वक तपासणी करुन त्यावरील आढळणाऱ्या जखमा, केस वगैरेची सविस्तर नोदं घ्या.

(अ) प्रेताची अवस्था व स्थिती कशी होती याचे वर्णन करा.

(ब) अंगावरील कपडे घालण्याची पध्दत, नेसत्या कपडयाचे रंग किवां विशेष लक्षणे दागिने व इतर वस्तू यांची सविस्तर माहिती घ्या.

(क) जखमांचे ठिकाण संख्या, स्वरुप, आकार, लांबी रुंदी, खोली, जखमेपासून रक्त वाहात होत अगर कसे? संभाव्य हत्यार कोणते? याचा सविस्तर उल्लेख करा. प्रेताला चिखल लागला असेल तर ते स्वच्छ करुन तेथे जखम आहे काय हे बारकाईने पहा.

(ड) प्रेताच्या अवयवाची म्हणजे हात, पाय, कान् नाक, डोळे, जीभ, दात, गळा, छाती, पोट, पाठ, गुप्तभाग या सर्वांची स्थिती नमूद करावी.

५. फास लावलेल्या, विषबाधा, गळा दाबून मृत्यु या बाबतीत मरण, बाबतीत दिसणाऱ्या विशेष लक्षणाची नोंद घ्यावी.

६. प्रेताचें ठिकाणी विशिष्ठ वास येत असेल तर त्याचा शोध घेऊन नोंद करा.

७. दातांचे बाबतीत नकली दात, शाबूत दात कोणते, दातांमधे चांदी भरली आहे अगर कसे, सोन्याचांदीचा नकली दात आहे कसे हे पाहावे. अंगावर गोंदल्याच्या खुणा आहेत अगर कसे त्याचप्रमाणे कान टोचंले आहेत काय या गोष्टी पहाव्यात.

८. प्रेतावरील सर्व कपडे काढण्यास लाजू नका. स्त्री प्रेताबाबत योग्य दक्षता घ्या व तपासणी करा, त्यासाठी स्त्री-पंच घेण्यास विसरु नका.

९. गुप्त भागाची तपासणी करण्यास विसरु नका.

१०. लिहीतांना व वर्णन करतांना वैद्यकीय शद्बांचा किवां परिभाषेचा उपयोग करु नका. कारण पंच त्यास अनाभिज्ञ असतात व काही वेळा चुकीची परिभाषा वापरली तर विपरीत परिणाम होतो.

**इन्क्वेस्ट करणेपूर्वी खालील बाबींकडे लक्ष द्यावेः-**

१. मरणाचें निश्चित कारण समजण्यास त्या ठिकाणाचें आजुबाजूचे सूक्ष्म निरीक्षण.

२. मरणाचें ठिकाण निश्चित करावे-जागेची पडताळणी परिस्थितीशी करावी.

३. प्रेताची स्थिती उदा. पाण्यात तरंगते, लटकते, रेल्वेलाईनवर पडलेले वगैरे.

४. प्रेताजवळ सापडलेली हत्यारे, बंदुकीच्या गोळया, विष, कपडे, जोडे, किंवा अगर इतर ओळख पटण्याजोग्या वस्तु त्यातील काही वस्तू वर नांव कोरलेले, अद्याक्षरे वगैरे.

५. काही विशिष्ट केसेसमध्ये झटापटींच्या खुणा, रक्त, पायाचें किंवा बोटांचे ठसे दिसतात अगर कसे.

**प्रेत उकरुन काढणे :-**

जर मृतदेह पुरलेला किंवा विधीपूर्वक दफन केलेला असेल तर त्यासंबंधा काही गुन्हा दाखल असेल व मरणाचें कारणाबाबत संगम व्यक्त करण्यात आला असल्याने प्रेताची उत्तरीय तपासणी न होता ते दफन झाले असेल तर ते प्रेत उकरुन तपासणी करावी लागते.

१. विधीपूर्वक पुरलेल्या किंवा दफन केला असेल ते प्रेत उकरुन काढण्यासाठी मॅजिस्ट्रेटची लेखी परवानगी आवश्यक आहे.

२. परवानगी मिळेपर्यंत प्रेत पुरल्याच्या ठिकाणी संरक्षण पहारा ठेवावा.

३. गुन्हयानंतर पुरावा नाहींसा करण्याचे इराद्याने पुरलेले वा लपविलेल्या प्रेताबांबत परवानगी लागत नाही.

४. प्रेत पुरल्याची जांगा, थडगे यांची ओळख पटवून घ्यावी.

५. दोन किंवा अधिक पंचासमक्ष प्रेत बाहेर काढा.

६. शक्यतो वैद्यकीय अधिकाऱ्यास हजर ठेवा.

७. जंतुनाशक औषध जवळ ठेवावे. व जरुर वाटल्यास प्रेताचे सभोवताली शिंपडावे. प्रेतावर शिंपडू नका.

८. प्रेताचे दुर्गंधीबाबत व प्रेत सडण्याचे प्रक्रियेबाबत योग्य नोंद घ्या.

९. डोके व हाडाची बारकाईने पहाणी करावी. प्रेतावर मारहाणी च्या निशाण्या आहेत किंवा काय ते पहाणे.

१०. खनिज व धातुजन्य विषाचा संशय असेल तर, हाडे, प्रेताचें पोटाखालील वरील माती वैज्ञानिक प्रयोग शाळेत तपासण्यास पाठवण्यासाठी गोळा करा व पाठवा.

११. जागेचीं व थडग्याची मोजमापाची नोंद घ्या.

१२. प्रेत पुरलेल्या व उकरलेल्या तारखांची व वेळेची नोंद घ्या.

# इन्क्वेस्ट रिपोर्ट

पंच

१. श्री.

१. श्री.

**जिल्हा मॅजिस्ट्रेट अगर पोट तुकडी मॅजिस्ट्रेट यांचे हुजुरांस**

१. आज रोजी रात्री ११.३० वाजतां नासिक येथील काजी पुऱ्यात शंकर रामा इंगळे यांस कोणी तरी चाकूनेवार करुन व काठयांनी जखमी करुन त्याचा खून केला त्याचे प्रेत विठ्ठल मदिरा समोर रोडवर पडलेले आहे. मयताची बायको पार्वती हिने अशी खबर भद्रकाली पो. ठाण्यांत येवून कळविले.

२. अशी बातमी कळताच मयत मनुष्याचे प्रेत होते तिकडे गेलो. आणि तेथे शेजारी रहाणाऱ्या दोघां अब्रुदार ईसमांच्या समक्ष सहयां यांच्यावर आहेत. सदरचे प्रेत मयत शंकर रामा इंगळे याचे असल्याचे त्याची बायको पार्वती हिने ओळखले.

३. प्रेताची स्थिती खालील लिहील्याप्रमाणे होती. प्रेत कोठे कसे पडलेले आहेत. त्याची स्थिती, अंगावर असलेले कपडे वर्णन लिहावे. प्रेतावरील अंगावरील जखमांचे वर्णन सविस्तर लिहा.

(१)....(२)-----(३)------(४)------

वरील अं. नं. १,२,-----या जखमा व अ. नं. ३,४ या जखमा कोणत्या हत्याराने झाल्या असे वाटते.

४. पंचाचे व माझे मत असे आहे की:- मृत्यु तीक्ष्ण हत्याराने गंभीर स्वरुपाच्या जखमामुळे घडला असावा तरीही मरणाचे नक्की कारण काय आहे हे समजण्या करिता प्रेत पो. कॉ. सखाराम ब.नं.५०९ याचे ताब्यांत देऊन तपासणीस सिव्हील सर्जन नासिक यांचे कडे उत्तरीय तपासणी करतां पाठविले.

हा पंचनामा ५ वाजता सुरुं करुन ६ वाजता संपविला.

तारीख . संमक्ष :- ......... पंचाच्या सहया :- १.----------------
पी.एस.ओ. २.---------------

## शेजारचे व इतर पोलीस ठाण्यांशी समन्वय :-

**इतर पोलीस ठाण्यांशी समन्वय :-**

**समन्वय :-**

सर्वांना एकच कृति, हालचाल करावयास लावून सांघिक कार्य करणे. उदा. परेड कार्य अत्यंत चांगल्या प्रतिचे व फलदायी होते. उदा. हॉकी, क्रिकेट मॅच इ.

**पोलीस खाते हे एक समूह.**

राज्यस्तर-रेंज स्तर-जिल्हा उप-विभाग स्तर-मंडलस्तर व पोलीस ठाणे.

कायदा सुव्यवस्था, गुन्हे व गुन्हेगारांवर नियंत्रण राहाणे कामास समन्वय व सुसूक्ष्मता राज्यात असणे आवश्यक.

**(अ) पो. स्टे.मधील अधिकारी व कर्मचारी यांचा समन्वय :-**

पोलीस निरीक्षक-उप निरीक्षक-सहा.पो.उपनिरीक्षक-हवालदार शिपाई यांचेत पोलीस ठाण्यातील विविध कामांबाबत सांगड घालणे जरुरीचे त्याकरीता :-

गुन्हयांच्या घटना, मिळालेले दुवे इतर माहिती तपास व प्रतिबंध यांची माहिती देणे व त्यांचेकडून मिळविलेली माहिती घेणे. सहकार्य व समन्वय राखण्यासाठी प्रमुख अधिकारी-प्रामाणिक, कर्तव्यदक्ष, निःपक्षपाती, कष्टाळू, चिकाटी असणारा,चारित्र्यवान, चांगले वर्तन असणारा असावा.

**(ब) रोजच्या पोलीस ठाण्यांशी समन्वय :-**

तपासाचे क्षेत्र लगतच्या पोलीस ठाण्यांशी वाढवावे. त्यासाठी जवळीक ठेऊन सहकार्य घ्यावे-द्यावे.

अटक, झडत्या, जप्त्या, माल, जप्त करणेबाबत शेजारील पो. ठाण्याची मदत घेणे व देणे.

कोणते मार्ग अनुसरावेत ? :- १. एकत्र -गुन्हे व गुन्हेगारांची माहिती. २. अटक गुन्हेगारांची एकमेकांकडून पाहणी व माहिती. ३. संदेश मिळताच तात्काळ कारवाई व हालचाल. हद्दीबाबत घोळ न घालता तात्काळ कारवाई.

**रेल्वे पोलीस व जिल्हा पो. ठाणी यांचा समन्वय :-**

हद्द-दोन डिस्टंट आऊटर सिग्नलच्या मध्ये दहा वीस मीटर रुंदीची असते. लांबवर विखुरलेली. गुन्हे-रेल्वे सालाच्या चोऱ्या, वॅगन्स लुटणे, फोडणे वगैरे यातील गुन्हेगार जिल्हा पो. ठाणेचे हयात मालाची विल्हेवाअ लावतात. माल घेण्याऱ्याची झडती घेऊन जप्त करणे व आरोपीस अटक करुन "रेल्वे प्रॉपर्टी अक्टप्रमाणे तजवीज होणेस संबंधीत रेल्वे पो. ठा.स. पाठविणे. त्यास शिक्षा जास्त असते.

रेल्वे अपघात, रेल्वेच्या विलंबामुळे होणारे संभाव्य दंगे, शांतताभंग, क्रुध्द जमावाने रेल्वे लाईन, रेल्वे स्टे. किंवा मालमत्तेची संभाव्य हानी याबाबत रेल्वे रुळांना ग्रीस लावणे, फिश प्लेट काढणे. इ. बाबत माहिती मिळताच हद्दीचा विचार न करता त्या ठिकाणी जाऊन खंबीररित्या शांतता व सुव्यवस्था राखून हानी टाळावी त्यामुळे रेल्वे पो. ठाणे व जिल्हा पो. ठाणे यातील संबंध सुधारत समन्वय साधिल. "हद्दीबद्दल कधीही वादविवाद करु नये."

● ● ●

# अटक

**अटक म्हणजे काय?**

१. कोणा सरनकारी इसमाने (नोकराने)

२. प्रचलित कायद्यान्वये अधिकार प्राप्त झालेल्या खाजगी मनुष्यानक दूसऱ्या मनुष्यास

रखवालीत ठेवणे, ताब्यात घेणे अशी व्याख्या करता येईल. कोणत्याही व्यक्तीस अटक करतांना त्याची ओळख पटवून घ्यावी. विशेषतः कोर्टाचे वारंट वरुन अटक करतांना.

अटक म्हणजे त्या इसमांस स्पर्श करुन व शद्बांने त्यास ताब्यात घेतलेले (कैद केले) आहे. असे सांगणे सदर इसमाने शद्बाने वा कृतीने ती अटक मान्य केली असेल तर प्रत्यक्ष त्याच्या शरीरास धरण्याची जरुरी नाही.

**अटक करण्याचे अधिकार :-**

१. कलम ४१ क्रि. प्रो. कोड कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला वारंट वाचून अटक करण्याचे अधिकार

(अ) दखलपात्र गुन्हयाबाबत ,

(ब) घरफोडींची साधणे बाळगण्याबद्दल,

(क) जाहीर केलेला गुन्हेगार असल्याबद्दल ,

(ड) चोरीचा माल किंवा इतर गुन्हयाशी संबंधित वस्तू जवळ बाळगण्याचा संशय असल्याबद्दल

(इ) पोलीस अधिकाऱ्याला त्याचे कर्तव्य बजावण्यास अडथळा केल्या बद्दल किंवा त्याच्या कायदेशीर रखवालीतून पळुन गेला असेल तर,

(फ) मुक्त झालेल्या गुन्हेगाराचे कलम ३५६ (५)चा भंग केल्याबद्दल,

(ग) दुसऱ्या पोलीस स्टेशनला एकाद्याबद्दल अटक करण्यासाठी मागणी पत्रक आल्यावरुन,

(ह) कलम १०९,११० क्रि. प्रो. को. प्रमाणे गुन्हयास पात्र असलयाबद्दल.

कलम ४३ क्रि. प्रो. को. प्रमाणे पोलीस अधिकाऱ्यास वारंटाशिवाय अटक करण्याचा अधिकार :-

अदखलपात्र गुन्ह्यामध्ये नाव व पत्ता सांगण्याचा नकार दिल्यास किंवा खोटे नाव व पत्ता सांगितल्याचा संशय असल्यास.

३. कलम ४८ क्रि. प्रो. को. प्रमाणे वारंटाशिवाय अटक करण्याचा अधिकार ज्या व्यक्तीस अटक करावयाचे आहे त्या व्यक्तीसचा पाठलाग करून भारतात कोठेही अटक करता येते.

४. कलम ६० क्रि. प्रो. को. प्रमाणे- जी व्यक्ती कायदेशीर रखवालीतून पळून जाईल त्या व्यक्तीचा पाठलाग करून भारतात कोठे ही अटक करण्याचा अधिकार आहे.

**अटक करतांना लक्षात ठेवण्याच्या गोष्टी :-**

१. अटक करावयाचा इसम अत्यंत महत्वाच्या सरकारी सेवेत असेल व त्याचे जागी सेवेवर दुसरा इसम आवश्यक आहे अशांना अटक करतांना त्याचे जागी दुसरा इसम आवश्यक आहे अशांना अटक करतांना त्याचे जागी दुसरा इसम नेमणूक होईतो त्यास काम सोडण्यास सांगू नये व जबाबदार अधिकाऱ्याची (वरिष्ठ) व्यवस्था करावी. उदा. स्टेशन मास्तर, सिग्नलर, कि-मन इ.

२. आमदार/खासदार यांना अटक केली असल्यास त्याची माहिती ताबडतोब तो आमदार खासदार ज्या गृहाचे सभासद असतील त्या गृहाचे सभापतीस तारेने किंवा वायरलेसने कळवावे.

३. आर्मी, नेव्ही, एअर फोर्स, सी.आर.पी.किंवा बी.एस.एफ. मधील कर्मचाऱ्यास किंवा अधिकाऱ्यास अटक केली असल्यास त्याची माहिती ताबडतोब त्यांच्या युनिट प्रमुखाला कळवावी. परंतु त्या अधिकाऱ्याने किंवा जवानाने आपले कर्तव्य बजावत असतांना एखादा गुन्हा केल्याचे सिध्द झाल्यास त्याला केंद्र सरकारच्या पूर्व परवानगी शिवाय अटक करता येत नाही.

**अटक करतांना पोलीस अंमलदाराने काय कृति करावी :-**

१. त्या व्यक्तीस अटकेची कारणे सांगावी व जामीन योग्य गुन्हा असल्यास जामीनाची व्यवस्था करण्यास सांगावे. (क्रि. प्रो.को.क.५०)

२. जरुरी पेक्षा जास्त बलाचा वापर करू नका (क्रि. प्रो. कि.क. ४९)

३. शक्यतो गणवेषात रहावे.

४. आरोपीची अंग झडती घ्यावी.(क. ५२)

५. आरोपीकडे मिळालेले शस्त्र/गुन्हा संबंधातील इतर वस्तू मिळून आल्यास त्या पंचासमक्ष जप्त करुन ताब्यात घ्याव्यात. (क्र. ५२)

६. ज्या भागात अटक केली त्या भागाचे उपविभागीय दंडाधिकाऱ्याकडे अटक कार्ड पाठवावे. (क. ५८)मात्र अटक पोलीस आयुक्त हद्दीत असेल तर कार्डे पाठविण्याची जरुरी नाही.

७. अंगुली मुद्रा नियमावली प्रमाणे सर्चस्लीप घ्यावी.

८. आरोपीची योग्य नमुन्यात चेहरेपट्टी घेऊन अटक रजिस्टर मध्ये घ्यावी.

९. अटक रजिस्टर व केस डायरी मध्ये अटकेचे ठिकाण तारीख व वेळ याची नोंद घ्यावी.

१०. जामीन योग्य अपराध असल्यास व तो जामीन देण्यास तयार असल्यास जामीनावर सोडावे.

११. जामीन घेण्याचा अधिकार पोलिस ठाणे स्वाधीन असणाऱ्या अंमलदारास आहे.

१२. आरोपीस अटक केल्यानंतर तो कैदेतून पळून जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

१३. अटक केल्यानंतर २४ तासांचे आत त्यास संबंधित नजिकच्या मॅजिस्ट्रेट समोर हजर करुन जरुरीप्रमाणे मॅजि. कोठडी/पोलिस कोठडीची रिमांड घ्यावी.

१४. नियमित केलेल्या वेळेवर त्याची भोजनाची व्यवस्था करावी.

१५. तपासाअंती पुरेसा व योग्य पुरावा नसेल तर त्या क्रि.प्रो.को.क. १६९ प्रमाणे सोडून द्यावे.

**विशेष व स्थानिक कायद्यांतर्गत अटक :-**

क्रि.प्रो.को. खेरीज इतर कायद्यांप्रमाणे वारंटाशिवाय अटक करण्याचे अधिकार प्राप्त होता. उदा. रेल्वे अक्ट प्रोहि. अक्ट, एक्साईज अक्ट इ.

वारंटावरुन अटक-बेलेबल-नॉन बेलेबल

मॅजिस्ट्रेटने काढलेले वॉरंट पो. स्टे. प्रभारी अधिकाऱ्याकडे पाठविले जाते. त्यानंतर ताबे पोलिसांमार्फत योग्य भुचलका घेऊन बजावले जाते. आरोपीची ओळख पटवून नंतर वारंट बजवावे (बेलेबल)

नॉन बेलेबल वॉरंट असल्यास संबंधितत इसमास ताब्यात घेऊन मॅजि. समोर हजर करे पर्यंत योग्य तो पहारा ठेवावा लागततो.

वारंट बजावणीपर्यंत, रद्द होईपर्यंत, काढून टाके पर्यंत अंमलात रहो.

**बळाचा वापर :-**

१. कमीततकमी बळाचा वापर करावा उदा. लाठीचार्ज २

२. अग्निशास्त्राचा वापर हा शेवटचा उपाय

**अग्निशास्त्राचा वापर :- क्र. ४६ क्रि.प्रो. कोड**

कमी कमी जखमी करावे. स्वसंरक्षणार्थ व मालमत्तेच्या रक्षणार्थ ज्या गुन्हयात मरणाची अथवा आजन्म कारावासाची शिक्षा सांगिली असेल त्या खेरीजचे गुन्हयात अग्निशास्त्राचा वापर त्या गुन्हयाचे स्वरुपावर अवलंबून राहील. अशा वेळी स्वसंरक्षणार्थ उपयोग करता येतो.

**हातकडीचा वापरः-**

व्यकतीचे चारीत्रय, वर्तणूक, स्वभाव यावर अवलंबून-प्रभारी अधिकाऱ्याने ठरवावे. आरोपी हिसंक बनेल किंवा पळून जाण्याचा प्रयत्न करील. असा आरोपी धोकादायक, भंयकरस्वरुपाची, धातकी, दरवडा, खुन सारख्या गंभीर स्वरुपाच्या गुन्हयात निष्पनन असेल त्यास हातकडी लावण्यात यावी.

**हातकडीचा वापर न करणेः-**

स्त्रियांचे बाबतीत, वयाचे दुष्टीने नियंत्रणात राहण्यासारखा, जामीनकीच्या गुन्हयात (हिसंक बनणारा पळून जाण्याची शक्यता असलेला सोडून) आजारी व्यक्ती, बाल गुन्हेगार, क.१७१ क्रि.प्रो. क. प्रमाणे अटक करण्यात आलेले साक्षीदार.

**विशीष्ट प्रकारच्या व्यक्तिचे बाबत त्यांचे प्रमुखांना कळविणे जरुरीचे :-**

रेल्वे कर्मचारी, सार्वजनिक सेवेमधील लोक, टेलीग्राफ, विधानसभा संदस्य, पाकिस्तानी ऑफिशिअल्स, राजदूत, भगोडे इसम, (सैन्यातील) बाल सुधार गृहातील मुले.

## रिमांड

रिमांड म्हणजे कैदेत परत पाठविणे. रिमांडचे दोन प्रकार आहेत.

१. पोलीस कस्टडी

२. न्यायलयीन कस्टडी

**रिमांड कोण देतात?**

१. कोणतेही ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट

२. एखाद्या मॅजिस्ट्रटने रिमांड नाकारल्यास त्याबद्दल सेशन्स कोर्टाकडे अपील करता येते.

**आरोपीस आपल्या कोठडीत ठेवण्यासाठी खालील गोष्टी कराव्यात :-**

१. अटकेनंतर २४ तांसाचे आत मॅजिस्ट्रेटसमोर हजर केले पाहिजे.

२. केस डायरीची नक्कल मॅजिस्ट्रेटला देणे.

३. ज्या कारणासाठी पोलीस कस्टडी मागीतली असेल ती कारणे नमूद केलेला रिपोर्ट

४. तपासी अमंलदाराने शक्यतो स्वतः हजर राहून मॅजिस्ट्रेटचे सहकार्य मिळवावे.

**पोलीस कस्टडी रिमांड कोणत्या कारणास्तव मिळू शकतेः-**

१. चोरीस गेलेली मालमत्ता हस्तगत करणेसाठी.

२. गुन्हयात वापरलेले हत्यार मिळविण्यासाठी.

३. गुन्हयाशी संबंधीत वस्तू उदा. रक्ताचे कपडे, शस्त्र, वापरलेले वाहन वगैरे हस्तगत करण्यासाठी.

४. आरोपीचे हस्ताक्षाराचे नमुने घेण्यासाठी.

५. गुन्हयात मिळालेले किंवा वापरलेले हत्यार कोठून आणले अगर आरोपीने कसे मिळविले याचा शोध घेण्यासाठी.

६. आरोपीचे गुन्हयातील इतर साक्षीदार शोधण्यासाठी.

७. आरोपीस वर्णन करुन निश्चित सांगता येत नाही व पोलीसांना जे गुन्हयाचे ठिकाण माहित नाही ते ठिकाण प्रत्यक्ष दाखविण्याकरिता किवां तो दाखवू शक्तो अशा वेळी.

८. फूट प्रिंट व फिगंर प्रिंट पडताळून पाहण्याकरिता.

९. उच्च व सर्वोच्च न्यायलयाचे महत्वाचे निवाडे.

## कबुली जबाब

कबुली जबाब म्हणजे ज्या इसमाने गुन्हा केला आहे. त्याने गुन्हयात प्रत्यक्ष केलेले कृत्य, घटनेत स्वतः घेतलेला भाग, याबाबत स्वतःवर जबाबदारी (गुन्हयाची मूळ घटना व इतर घटना) घेऊन दिलेला जबाब किवां त्याने त्या गोष्टीचां केलेला स्वेच्छेने अंगिकार वा स्वीकार होय.

**कबुली जबाबाचें दोन प्रकार आहे.**

१. ज्युडिशियल कन्फेशन

२. एक्स्ट्राज्युडि. कन्फेशन

**१. ज्युडिशियल कन्फेशन**

म्हणजे क्रि. प्रो. को. क. १६४ अनव्ये मॅजिस्ट्रेटने आरोपीचा घेतलेला कबुली जबाब होय. अशा कबुली जबाबास खटला चालू असतांना पुराव्याच्या दुंष्टीने बरेच महत्व आहे. परंतु अनुभव असा आहे की, आरोपी नेहमीच बदलतो. आणि सांगतो की, पोलीसांनी त्यांचेवर दडपण आणल्यामुळे त्याला तसा कबुली जबाब द्यावा लागला. एकदा आरोपीने कबुली जबाब नाकारला म्हणजे तो आरोपीने स्वखुषीने दिला होता हे सिध्द करण्याची जबाबदारी फिर्यादी पक्षावर असते.

**२. एकस्ट्रा ज्युडिशियल कन्फेशन :-**

म्हणजे न्यायधिकाऱ्याशिवाय इतरांपुढे (पोलीस अंमलदार सोडून)आरोपीने दिलेल्या जबाबास एक्ट्रा ज्युडिशियल कन्फेशन असे म्हणतात. बहुधा दिलेल्या इसमाजवळ तो कबुली जबाब दिलेला असतो त्याच्या तोडीं सांगल्याने तो सिध्द होतो. अशा प्रकारच्या कबुली जबाबाचे महत्व बऱ्याच गोष्टीवर अवलंबून असते. त्या गोष्टी म्हणजे ज्या इसमाजवळ असा कबुली जबाब दिल्यास त्याचे चारित्र्य सामाजिक प्रतिष्टा, ज्यावेळी तो देण्यात आला त्यावेळी भोवतालच्या परिस्थिती वगैरे आरोपीने त्या इसमाजवळ केलेला कबुली जबाब आणि त्याची कोर्टातील साक्ष यात किती कालावधी गेला आहे आणि आरोपीने ज्या शद्वात कबुली दिली त्याच शद्वात साक्षदार कोर्टात सांगू शकतो काय, या सर्व गोष्टीवर कबुली जबाबाचा खरे खोटेपणा अवलंबून राहील.

**कबुली जबाब कोणकोणत्या परिस्थतीत ग्राहय ठरतो.**

१. पोलीस अंमलदार सोडून तिऱ्हाईत मनुष्यासमोर सांगितला असेल. (पुरावा का. क. २५)

२. पोलीसाचे रखवालीत असतांना मॅजिस्ट्रटचे समोर सांगितला असेल. (पुरावा का.क.२६)

३. जर चोविसाव्या कलमात लिहीलेल्या प्रकारची कबुली ही तशाच उत्तेजनाचा, धमकीचा किवां वचनाचा आरोपीचे मनावर उमटलेला ठसा कोर्टाचे मते पूर्णपणे नाहीसा झाल्यावर सांगितला असेल. (पुरावा का.क.२८)

४. पोलीसाचे रखवालीत असतांना पोलीसाजवळ सांगितला असेल आणि कबुली जबाबात मिळालेल्या माहितीवरुन एखादी गोष्ट उघडकीस आली असेल (पुरावा का.क. २७)

**कबुजी जबाब कोणकोणत्या परिस्थतीत अग्राहय ठरतोः-**

१. पोलीस अंमलदाराजवळ सांगितला असेल (पुरावा का.क. २५)

२. पोलीसांचे रखवालीत असतांना मॅजिस्ट्रेट खेरीज करुन इतर मनुष्यासमोर सांगितलेला असेल (पुरावा कायदा क. २६)

३. एखाद्या अंमलदाराकडून उत्तेजन, धमकी किंवा वचन दिल्यामुळे, आपला काही तरी फायदा होईल अथवा ऐहीक असे आपले कोणतेही दुःख टळेल हया समजुतीने सांगितला असेल (पुरावा का. क.२४)

४. पोलीसांचे रखवालीत असतांना पोलीसांजवळ सांगितला असेल आणि कबुली जबाबात मिळालेल्या माहितीवरुन काही गोष्टी उघडकीस आल्या नसतील. (पुरावा का. क. २७)

**कबुली जबाब कायदेशीर तरतुदी क्रि.प्रो. का.क. १६४.**

१. दिनांक १-४-१९७४ पासून फक्त ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट वर्ग-१ व महानगर दंडाधिकारी कबुली जबाब व साक्षीदारांचे शपथेवर निवेदन घेऊ शकतात.

२. कबुली जबाब तपास चालू असतांना अगर तपास झाल्यानंतर परंतु केस सुरु होण्यापूर्वी घेता येतो.

३. आरोपी खरोखरच कबुली जबाब देणार आहे याची प्रथम खात्री करुन मगच त्याला मॅजिस्ट्रट कडे पाठवावे. कारण तो जर मॅजि. पुढे म्हणला कि तो कबूली देण्यास तयार नाही, तर पुढील पोलिस कस्टडी रिमांड रद्य होतो. त्यामळे तपासावर परिणाम होतो. (क. १६४ पु. कायदा)

४. कबुली जबाब दिलयानंतर त्याची नक्कल घेऊन त्यात सांगितलेल्या हकीगतीप्रमाणे पुढील तपास करुन पुरावा गोळा करावा. तरच कबुली जबाब सत्य व आपखुषीचा होईल. थोडक्यात कबुली जबाब तपासाची सुरुवात असते. शेवट नसतो. परतु काही प्रसंगी तपासी अधिकारी आरोपीने कबुली जबाब दिला की, तपास पुरा करतात. हे योग्य नाही.

५. कबुली जबाब दिल्यानंतर संबंधीत कोर्टाकडे पाठविणे आवश्यक असते. काही वेळा तसे होत नाही त्यामळे सेशन्स कोर्टात त्या अभावी साक्षीकरिता पुढील तारीख दिली जाते. तरी प्रत्यक्षात तशी व्यवस्था कोर्टाकडून झाली की, नाही याची चौकशी करणे आपल्या हितांचे असते. (क. १६४ (६))

६. **कबुली जबाब घेण्याची पध्दती :-**

तो प्रश्नोत्तर स्वरुपात असावा. वाचून दाखवावा. आरोपीची सही घ्यावी. त्यावर शेरा वगैरे (क. १६४ (४)) परंतु प्रत्यक्षात अशी पध्दत मॅजिस्ट्रेटकडून काही प्रसंगी वापरली जात नाही. त्याचा आरेपी तर्फे घेण्याचा प्रयत्न होतो परंतु अशा चुका, दोष माफ होतात. व घेतलेला कबुली जबाब ग्राहय होतो. (क. ४६३ क्रि.प्रो.को.) उदा. आरोपीची सही न घेणे प्रश्नोत्तर स्वरुपात न घेणे. वगैरे.

७. कबुली जबाब घेण्यासाठी आरोपीला मॅजि. कस्टडीत पाठविण्याची मॅजिस्ट्रेटला विनंती करावी. व ठराविक कालवधी गेल्यानंतर त्याचा कबुली जबाब घ्यावा म्हणजे पोलीसांचा त्याचेंवर दबाव होता असा बचाव आरोपी पक्षातर्फे घेतला जाणार नाही.

८. **कबुली जबाब केव्हा घ्यावा-?**

कोर्टाचे वेळात सकाळी ११ ते ६ वाजता चे दरम्यान घ्यावा. सुटीचे दिवशी अगर मॅजिस्ट्रेटचे घरी घेऊ नये. कारण कबुली जबाब स्वखुपीने व मोकळेपणे दिला यास फार महत्व आहे.

९. साक्षीदारांचे जबाबः-

महत्वाचे केसेस मध्ये व जेव्हां साक्षीदारावर दडपण येण्याची अगर फितुर होण्याच शक्यता असते अशावेळी त्याचे शपथेवर निवेदन घेणे आवश्यक आहे व ते फायदेशीर ठरते. (क. १६४)

## मृत्यु पूर्व जबाब

१. मरणासन्न व्यक्तीने मृत्युचे कारण अगर परिस्थीती याबदल कोणाही व्यक्तीपुढे तोंडी अगर लेखी निवेदन म्हणजेच मृत्युपूर्व जबाब होय. (पु. का.क. ३२ (१ ) ) ऐकीव पुरावा ग्राहय नसतो. हया नियमास कलम ३२ ( १) अपवाद आहे. वरील प्रकारचे पोलीसा पुढील निवेदनास क्रि.प्रो. को. क. १६२ ची हरकत नाही. मृत्यु जवळ आला असता मनुष्य खोटा बोलणार नाही या महान तत्वावर मृत्युपूर्व जबाबास महत्व आहे.

२. असा जबाब देतांना मनुष्य जखमी, मरणोन्मुख असतो. पण नेहमीच तशी स्थिती आवश्यक नाही. म्हणजे चांगली प्रकृति असतांना मृत्यू येण्यापूर्वी बराच काळ आधी निवेदन केले असले तरी चालते.

३. पुरावा ग्राहय केव्हा ठरतो?

(अ) जबाब देणारा मनुष्य मयत झालेला असावा.

(ब) जबाब मरणाचे कारणाविषयी असावा.

(क) ज्या परिस्थितीत मरण आले त्या परिस्थितीबाबत निवेदन असावे.

(ड) ज्या खटल्यात त्याचे मरणाचा विचार चालू आहे त्याच खटल्यात तो पुरावा असावा.

४. मरणोन्मुख जबाब कोणी घ्यावा?

कायदयाप्रमाणे कोणीही घेऊ शकतो. उदा. पोलीस डॉक्टर, नागरीक, मॅजिस्ट्रेट वगैरे.

५. कोणत्या नमुन्यात असावा ?

याबद्दल खास फार्म नाही. जबाब सत्व व आपखुशीचा असावा. हे गृहित तत्व असल्याने प्रश्नोत्तर स्वरुपात असावा. डॉक्टर समक्ष असल्यास त्याचा शेरा देऊन समक्ष सही असावी. की जखमी इसम जबाब देण्याचे परिस्थितीत शुध्दीवर होता.

**मृत्यूपूर्व जबाब कसा लिहावा ?**

१. शक्य असल्यास एक्झीक्युटीव्ह. मॅजि. समोर घ्यावा. तसे शक्य नसल्यास पोलीस अधिकारी घेऊ शकतो.

२. त्या इसमाचे शद्वात प्रश्न-उत्तर स्वरुपात घ्यावा.

३. जबाब घेतांना फक्त डॉक्टर, पोलीस, मॅजि. असावेत. जखमी इसमाचे नातेवाईक जवळ असू नयेत. अगर त्यांना त्यावेळी बोलण्याची संधी देऊ नये.

४. हल्लेखोरांचे स्पष्ट वर्णन असावे. नाव असल्यास घ्यावे.

५. बोलणे शक्य नसल्यास खुणांचे वर्णन असावे. पंरतू त्याचा अर्थ स्वतःच लावून मॅजि. ने लिहू नये.

६. जबाब देतेवेळी तो शुध्दीवर असून मानसिक दृष्टया योग्य असा डॉक्टरचा दाखला जबाबवर घ्यावा.

७. जबाब थोडक्यात असावा. महत्वाचा आवश्यक भाग त्यात असावा. सविस्तर जबाब असल्यास संशय निर्माण होण्यास जागा असते, की तो बनावट व मुद्याम पटवून सूचवून सांगितला असावा.

८. जबाब देणाऱ्याचे भोपत मृत्यूपूर्व जबाब लिहून घ्यावा. दुभाष्याची मदत घेतली असेल तर त्याची साक्ष कोर्टात घ्यावी.

९. विवाहीत स्त्री आत्महत्या करते असा जबाब तिचे जवळचे नातेवाईक अगर कुटूंबातील वजनदार नातेवाईकांसमोर घेऊ नये. त्यांचा दबाव पडतो. स्वतंत्र, अबुदार इसमासमोर घेणे.

## ओळख परेड

**उद्येश :-**

अटक केलेला आरोपी हाच खरा गुन्हेगार आहे. सिध्द होणे जरुरीचे आहे. तसेच जप्त मुद्येमाल हा फिर्यादीचाच आहे हे पटविणे महत्वाचे आहे. त्याची ओळख पटवून दिली तर तो महत्वाचा निर्णायक पुरावा होतो. रात्रीचे वेळी जर वेष पालटून गुन्हा केलेला असेल व आरोपी हे माहितीचे नसतील पंरतु साक्षीदारानी त्याला पाहिलेले असेल तर अशी ओळख आवश्यक असते. तसेच मुद्येमाल हा सर्वसाधारण वर्णनाचा असेल तर तो निश्चितपणे फिर्यादीचा आहे हे शाबीत होणे आवश्यक असते. (उदा.

दागिणे, कपडे)

**ओळखणे म्हणजे काय ?**

ओळखीचा पुरावा भा. पु. का. क. ९ प्रमाणे ग्राहय आहे. अशी ओळख वस्तू आणि व्यक्ती दोघांची पटविता येते.

**ओळख परेड कोणी घ्यावी ?**

ओळख परेड एक्झीक्युटीव्ह मॅजिस्ट्रेट यांनी घ्यावी. ज्युडी. मॅजि. यांनी घेऊ नये असा ठराव गृहखाते मुंबई यांनी दि. २२-४-१९५५ रोजी केला आहे.

**ओळख परेड करतांना खबरदारी घ्यावी ?**

१. एका आरोपी करिता कमी ६ इसम - दोघांकरितां १०-१२ या प्रमाणात निवड करावी.

२. संबंधित आरोपीच्या वयाचे, धर्माचे बांध्याचे इसत निवडावेत.

३. परेड बंदिस्त जागेत घ्यावी. एकेक साक्षीदार स्वतंत्रपणे बोलवावा. त्याला परेड दिसता कामा नये.

४. पोलीसांनी हजर राहू नये.

५. एका साक्षीदाराने ओळखल्यानंतर त्याला दुसऱ्या साक्षीदारास भेटण्याची संधी देऊ नये.

६. साक्षीदार येण्यापूर्वीच आरोपीस जागा पुन्हा बदलण्याची सूचना द्यावी.

७. संशयित आरोपीस कपडे बदलण्यास द्यावे.

८. त्याची खास हरकत असेत तर नोंद करावी.

**सविस्तर पंचनामा आवश्यक :-**

ओळख परेडसाठी किंती इसम उभे केले, त्यांची नावे, वय, आरोपीस कोठे उभे केले होते, ओळखल्यास किती वेळ लागला, साक्षीदाराने आरोपी कसे ओळखून काढले (हात धरुन, बोट वगैरे ) हा उल्लेख असावा.

**मालमत्ता-वस्तू-ओळख :-**

सापडलेल्या वसतू (कपडे, दागिने, हत्यारे वगैरे ) यांचा गुन्हयाशी संबंध जोडणे जरुर असते. त्यासाठी ओळखण्याच्या वस्तू, इतर मिळत्याजुळत्या वर्णनांच्या वस्तुंमध्ये मिसळून साक्षीदारांना त्या ओळखून काढण्येस सांगण्यात येते. व ते कशा प्रकारे वस्तू ओळखतात याचा सविस्तर पंचनामा करण्यात येतो.

**पोलिसांनी तपास चालू असतांना घेण्याची काळजी :-**

१. संशयित इसमास अटक करताच लौकरात लौकर ओळख परेड घ्यावी. उशीर झाल्यास साक्षीदारांना आरोपी दाखविण्यात आला असा अनुमान कोर्ट काढू शकते.

२. तपास चालू असतांना साक्षीदांराना तो आरोपी सहजासहजी दिसणार नाही याची काळजी घ्यावी. त्यासाठी अटक होताच त्यास बुरखा घालावा. व पडदा लावावा. (लॉकअपल)

३. ओळख पेड घ्यावयाची, आरोपीची पोलीस कस्टडी न घेता मॅजिस्ट्रेट कस्टडी घ्यावी व मॅजिस्ट्रेट यांना आरोपीस परेडसाठी एक्झीक्युटीव्ह मॅजिस्ट्रेटकडे पाठविण्याची विनंती करावी.

४. ओळख परेड बंदिस्त जागेत घ्यावी. जास्तीत जास्त आवारात घ्यावी. कारण ती जागा बंदिस्त असते. व त्या ठिकाणी आपल्याला वेगवेगळया बांध्याचे व उंचीचे लोक मिळू शकतात.

**कोर्टाकडून कोणत्या गोष्टी पाहिल्या जातात ?**

भा. पु. का. क. ९ प्रमाणे पुरावा ग्राहय धरला जात असल्याने खालील परिस्थीती कोर्ट विचारात घेते.

१. परेड उशिरा घेतली काय ?

२. मॅजि. ने परेड घेतांना आवश्यक ती खबरदारी घेतली काय ?

३. परेडचे वेळी जागा, प्रकाश कसा होता ?

४. साक्षीदारांचे वय, प्रकृती, दृष्टी कशी होती ?

५. साक्षीदारांना परेडपूर्वी आरोपीस पहाण्याची संधी मिळाली कां ?

६. साक्षीदार पूर्वीपासून आरोपीस ओळखत होता का ?

७. परेड पोलीसांनीच आयोजित केली होती काय ?

८. पंचनामा पोलीसांचे हस्ताक्षरात आहे काय ? ते हजर असण्याची शक्यता होती काय ?

९. साक्षीदार परेड वेळी आरोपीस ओळखण्यास किती वेळा घेतात ? त्याला कसा ओळखला ? जसे खुणेने, हात लावून, नाव सांगुन वगैरे .

१०. आरोपीने गुन्हा करतेवेळी काय कृत्य केले होते ? याबाबत साक्षीदाराने सांगितले काय ?

**ओळख परेड चे कायदयाप्रमाणे महत्व :-**

पहिल्या खबरीत आरोपीस आहे असे नमूद केले आहे. फिर्यादी व साक्षीदार यांनी पहिल्या खबरीत की, यांनी आरोपीस गुन्हयाचें वेळी पुरेशा प्रकाशात बराच वेळ पाहिले आहे. आरोपी दाखविल्यास ते ओळखू शकतील तर ओळख तर ओळख परेड योग्य पुरावा होऊ शकते.

पहिल्या खबरीत आरोपीची नावे असल्यास ओळख परेड घेण्याची जरुरी नाही. नावे नमूद नसली तरच ओळख परेड घेण्याची जरुरी असते.

घटना घडल्यानंतर बरेच दिवसांनी जरी आरोपीस ओळखले (उशीरा अटक झाली असल्यास) तरी पुरावा विचारात घेतला जातो.

ओळख परेड हा समर्पक पुरावा मानता येत नाही. इतर पुरावा नसल्यास केवळ ओळख परेड हा पुरावा गुन्हा शाबीत होण्यास पुरेसा पुरावा नसतो.

● ● ●

## झडत्या व जपत्या

**झडती :-**

पोलीस तपासात झडती म्हणजे एकाच जागेची किंवा इसमाची पुरावा मिळविण्यासाठी किवां गुन्हयाचें संबंधातील वस्तुचा शोध घेण्यासाठी केलेली तपासणी.

**जप्तीः-**

झडतीत मिळालेली एखादी वस्तू तपास कामी प्रत्यक्ष कायदेशीर ताब्यात घेणे.

**झडतीचा अधिकारः-**

१. व्यक्तीस अटक करण्यासाठी वारंटाशिवाय एखाद्या जागेची झडती घेणे. (क्रि. प्रो. को. क. ४७)

२. वरील प्रमाणे झडती घेत असल्यास घर मालकाने झडती घेण्यासा नकार दिल्यास योग्य तो बळाचा वापर करुन प्रवेश मिळविण्याचा अधिकार (क्रि. प्रो. क्रा. कलम ४७ (२))

३. अटक केलेल्या व्यक्तीची वारंटाशिवाय झडती घेण्याचा अधिकार (क्रि. प्रो. की. क. ५०)

४. अटक केलेल्या व्यक्तीकडे हत्यार मिळाल्यास ते जप्त करण्याचा अधिकार (क्रि. प्रो. की क. ५२)

५. वॉरंटावरुन एखाद्या वस्तुसाठी एखाद्या जागेची झडती घेण्याचा अधिकार (क्रि. प्रो. की.क. ९३)

६. वॉरंटावरुन चोरीचा माल किंवा इतर गुन्हापात्र वस्तू मिळविण्याकरिता एखाद्या जागेची झडती घेण्याचा अधिकार (क.९४) अशा ठिकाणी एखाद्या गुन्हयाशी संबंधित आहे असा संशय असणारी व्यक्ती मिळून आल्यास त्याला ताब्यात घेण्याचा अधिकार आहे.

७. वॉरंटावरुन वर्तमानपत्रे, नियतकालिक, पुस्तके, व इतर कागदपत्रे यांच्या सर्व प्रति जप्त करण्याचा अधिकार (क.९५)

८. वॉरंटावरुन एखाद्या डांबवून ठेवलेल्या व्यक्तीची सुटका करण्यासाठी एखाद्या जागेची झडती घेण्याचा अधिकार (क. ९७)

९. वॉरंटावरुन पळवून नेलेल्या स्त्रीची सुटका करण्याचा अधिकार (क.९८)

१०. वरीलपैकी कोणत्याही जागेची झडती घेतांना घरमालकाने प्रवेश करु देण्यास अडथळा केल्यास बळाचा वापर करुन प्रवेश करण्याचा अधिकार क.२०० (२) हया कलमामध्ये जागेची झडती कशी घ्यावी संपूण माहिती दिलेली आहे.

११. वॉरंटाशिवाय चोरीचा माल किवां गुन्हयाशी संबंधित वस्तू जप्त करण्याचा अधिकार (क. १०२)

१२. पोलीस स्टेशन अधिकाऱ्यास एखाद्या जागेत प्रवेश करुन वजने व काटे तपासण्याचा व ती जर बेकायदेशीर असतील तर जप्त करण्याचा अधिकार (क.१५३)

१३. गुन्हयाच्या तपासकामी आवश्यक असणाऱ्या कोणत्याही वस्तूसाठी पो. स्टे. हयातील एखाद्या जागेची झडती घेऊन ती जप्त करण्याचा अधिकार (क.१५३)

१४. वरील कारणांसाठी बाहेरील पो. स्टे. हद्दीत झडती घेऊन वस्तू जप्त करण्याचा अधिकार (क.१६६)

## झडतीची क्रियारिती

| | | |
|---|---|---|
| बंद जागा स्वाधीन् असणाऱ्या इसमांना झडती घेऊ द्यावी (क.१०० (१)) | १. झडती घेण्याच्या जागी प्रवेश मिळत नसेल तर खिडक्या दारे फोडण्याचा अधिकार (क. ४७ (२)) | १. झडती दोन पंचासमक्ष (क. १०० (४)) |
| | २. वस्तूसाठी इसमाची अंगझडती (क. १०० (३)) | २. मालकास किंवा भोवावटा करणारे इसमास झडतीचे वेळी हजर असण्याची मोकळीक (क. १००,(६) |
| | ३. झडतीच्या वेळी पंचाना हजर राहण्यास सांगणे (क. १०० (४), (८)) हजर शिक्षा (क. १७८ भा. दं. वि. वि. सं) | ३. जप्त वस्तूची यादी व सापडलेले ठिकाण पंचनाम्यावर पंचाची व साक्षीदारांची सही (१०० (५)) |
| | | ४. इसमांकडून जप्त केलेल्या मालाची यादी तयार करणे. (क. १०० (३)व (७)) |
| | | ५. पंचनाम्याच्या नकला त्वरीत मालकास किवां भोगवटा करणाऱ्या इसमास व अंग झडती घेतलेल्या इसमास देणे आवश्यक (१०० ( ६), (७)) |

६. ज्या परिस्थतीत पोलीस वॉरंटा शिवाय झडती घेतातः-

(अ) झडतीची कारणे नोदंविली पाहिजेत (क. १६५ (१))

(ब) पो. ठाणे अमंलदार किंवा तपासी अमंलदार दुसऱ्या इसमांस झडतीचे कामी देऊ शकतो. (क. १६५ (२)(3))

(क) वरील (अ) व (ब) मधील झडतीच्या नकला त्वरीत मॅजी. कडे पाठवाव्या (क.१६५ (५))

**पोलिस अधिकाऱ्याने झडतीपूर्वी घेण्याची काळजी :-**

१. पंच हे स्वतंत्र, अबुदार शक्यतो त्या भागातील असावेत.

२. सोबत आवश्यक जप्ती यादीचे फॉर्मस, साक्षीदार, समन्य, फॉर्मस्ट, पुरेसे कोरे कागद, कॉर्बन पेपर पेन, सील, लाख, आगपेटी मेणबत्ती व झडतीचा आदेश आवश्यक असल्यास तो त्याबद्दलचा ठराव (क. १६५ नुसार)इ. घ्यावे.

३. आवश्यक तो स्टाफ घ्या व त्या जागेची टेहाळणी करुन बाहेर बंदोबस्तासाठी किती लोक घ्यावे या अंदाजाने लोक घ्यावेत. त्यासाठी ज्याची झडती घ्यायची आहे. त्याचे नांव गुप्त ठेवा. व अगोदर सुरक्षा व्यवस्था तयार ठेवा.

४. पोलीस स्टेशनपासून त्या जागेचा प्रवास जलद करावा. परंतु त्या भागात राहाणाऱ्या लोकांना कोणताही संशय येणार नाही याची काळजी घ्या.

५. त्या ठिकाणी पोहचताच त्या घराच्या प्रवेशद्वारपासून किंवा बाहेर पडण्याच्या जागांवर पहारा लावा.

६. त्या भागाची व जागेची बारीक भौगोलिक परिस्थितीचा अगोदर अभ्यास करावा.

७. ज्या घराची झडती घ्यावयाची त्याचे मालकास अगर भोगवटा करणाऱ्यास आपली स्वतःची, पंचाची व बरोबरच्या सहकाऱ्यांची ओळख करुन घ्या.

८. झडतीचे उद्देश व कारणे समजावून सांगा.

९. झडती घेणाऱ्याने स्वतःची व तुकडीची व पंचांची झडती घेण्यास घर मालकास सांगावे, तो तयार नसेल तर त्यांनी त्याचे जवळील वस्तू दाखवून नंतर झडती घ्यावी.

१०. प्रवेश देण्यास तयार नसेल तर क. ४७ (२)व १०० (२) हयात नमूद केल्याप्रमाणे प्रवेश मिळवावा.

११. आवश्यकतेपेक्षा जास्त पोलीस स्टाफ घरात घेऊ नका.

**घरझडती चालू असतांनाः-**

१. घरात प्रवेश करताच घरातील कर्त्या इसमास संबंधीत मालमत्ता हजर करण्यास सांगावे . व हजर केल्यास ती जप्त करुन पुढील त्रास व श्रम वाचवावे.

२. प्रवेश करताच घरातील सर्व व्यक्तींना एका ठिकाणी व असतील त्या ठिकाणीच बसण्यास सांगा. त्यांच्यावर कडी नजर ठेवण्याची व्यवस्था करा.

३. घरातील स्त्रियांनाही एका बाजूस थांबण्यास सांगून त्यांना नजरेआड होऊ देता कामा नये.

(अ) जर घरातील स्त्रिया गोषांमधील असतील तर त्यांना झडती सुरु करण्यापूर्वी बाहेर जाण्यास विनंति करावी. व त्यासाठी त्यांना झडती सुरु करण्यापूर्वी बाहेर जाण्यास विनंति करावी. व त्यासाठी त्यांना पूर्ण मूभा द्यावी. (क. ४७ (२))

(ब) कलम ५१ प्रमाणे एखाद्या स्त्रीची झडती घ्यावयाची असल्यास ती फक्त स्त्री पंचाकडून करुन घ्यावी. (क. ५१ (२))

४. अधिकाऱ्यांनी व इतर अमंलदारांनी उगीच गर्दी करु नये. जर संभाव्य हल्ला झाला तर त्यापासून संरक्षणाची व्यवस्था व विचार करावा.

५. अर्धवट झडती घेऊ नये. घाईगर्दिने नियोजन न करता झडती न घेता पध्दतशीर घ्यावी. इंच आणि इंच जागेची झडती झाली पाहीजे व पाहिजे ती वस्तू (मालमत्ता) ज्यात ठेवली जाण्याची शक्यता आहे. अशा वसतू झडतीत पाहिल्या पाहिजेत. (उदा. धान्य, पिठाचे डबे यांत दागिन्यांसाठी इ.)

६. काही वेळा वस्तू पुरुन ठेवलेल्या आढळून येतात. म्हणून अंमलदाराने ठिसून जागा, नवीन तयार केलेली जमीन, पोकळ जागा, छत, भिंत, फर्निचरची पोकळी बारकाईने लक्ष देऊन तपासावेत, कोठे नुकतेच खोदलेले वगैरे पहा.

७. झडती चालू असतांना त्या घरातील एक इसम सुरुवातीपासून बरोबर ठेवावा.

८. अमंलदाने त्या घरातील प्रमुख इसम व त्यांच्या हालचाली, नेत्रपल्लवी यावर विशेष लक्ष द्यावे. कित्येकदा ते वस्तू ठेवलेल्या जागी घुटमळतात किवां वारंवार तिकडे नेत्रकटाक्ष टाकीत असतात. त्यावरुन ही वस्तू कोठे लपविल्या असतील त्याची माहिती मिळू शकते.

९. जर आणखी इतर जागेच्या झडत्या घ्याव्याच्या असतील तर त्याने हेतू उघड न करता त्या जागांवर व भागांवर, आजुबाजूला लक्ष ठेवण्याची दक्षता घ्यावी किंवा अधिकाऱ्यांकरवी एकाच वेळी झडत्या सुरु कराव्या.

१०. झडती घेणाऱ्या अंमलदाराने जप्त वस्तूची यादी (पंचनामा) लिहावयाची आहे. कारण तो अधिकार त्यालाच आहे.

११. झडतीत दागिने जप्त करावयाचे झाल्यास सोनारामार्फत दाखवून, वजन करुन ते एका डब्यात ठेऊन तो पचांचे साहयाने सील करा.

१२. झडती घेणाऱ्याने प्रामाणिक व निःस्पृह राहून झडती घ्यावी. कोणताही गुन्हा सिध्द होण्याजोगी (वस्तू) तेथे ठेऊ नये.

१३. कोणत्याही अनावश्यक वस्तू जप्त करु नका. व झडती घेतांना जागेची व वस्तुची विनाकारण मोडतोड, खराबी करु नका.

१४. जप्ती यादीच तेथेच तयार करा. व ती पंचांना वाचवून दाखवून त्यावर त्यांच्या सहया घ्या.

१५. त्या जप्ती यादीची एक प्रत घरमालकास त्याची पावती घेऊन द्यावी. त्याने सही करण्यास नकारल्यास तशी नोदं घ्या.

१६. नोटा जप्त करतांना त्या नोटांचे नंबर जप्ती यादीत घ्या.

१७. जप्त केलेल्या वस्तूंनबर गुन्हा रजिस्टर नंबर माहितीचे लेबल लावा.

**घरझडती संपल्यावर काय करावे :-**

१. घरांबाहेर पडतांना घरमालकास स्वतःचीं व जप्ती पार्टीची झडती द्यावी. व जप्त केलेल्या वस्तू व्यतरिक्त दुसऱ्या कोणत्याही वस्तु बरोबर नेतनाही याची खात्री करुन घ्या.

२. झडतीचे रेकॉर्ड संबधाचे दस्तऐवज ताबडतोब संबंधित मॅजि. ला पाठवा. (क. १६५ (१), (३)चा ठराव व झडतीची कारणे याच्या ठरावाची नक्कल व जपती यादीची नक्कल)

३. झडती घेतल्याबदल स्टेशन डायरी व केसडायरीत नोदं घ्या.

४. मद्येमाल कारकुनाकरवी (मोहरीर) संबंधीत रजिस्टरमध्ये नोंद घ्या. व जप्ती यादीवर त्याच्या अनुक्रम नंबराची नोंद घ्या.

**अटक आरोपीने मद्येमाल काढून घेणे.**

**पुरावा कायदा-कलम २७**

(अ) कायदयाप्रमाणे पोलीसांपुढे आरोपीने अगर साक्षीदाराने दिलेला कबुली जबाब किंवा निवेदन ग्राहय नसते. तसेंच त्याचेवर सही घेता येत नाही. असा नियम क्रि. प्रो. की. क. १६२ (१) प्रमाणे आहे. परंतु या कलमाना दोन अपवाद आहेत.

१. मृत्यूपूर्व जबाब पुरावा कायदा क. ३२ (१)

२. अटक आरोपीने मद्येमाल काढून देणे पु.का. क. २७.

(ब) अटक आरोपीने क. २७ प्रमाणे केलेले निवेदन ग्राहय होते. कारण प्रत्यक्षात त्या निवेदनाप्रमाणे काही वस्तू, मद्येमाल सापडतो म्हणूनच अशी माहिती जरी कबुली जबाब होत असली तरी ग्राहय असते. म्हणजे क.२७ हे क. २५ ला अपवाद आहे.

**कलम २७ चा उद्येश :-**

तपासकामी पोलीसांना अटक करावी लागते. अशा आरोपीने गुन्हा केल्यानंतर सहज प्रवृत्ती अशी असते, की, मुद्येमाल लपवून ठेवावा अगर नाहीसा करावा म्हणजे आपल्याविरुध्द पुरावा राहणार नाही. म्हणूनच आरोपी स्वतःचे घरात मुद्येमाल न ठेवता दूर जंगलात इतर ठिकाणी प्रेत, दागिने कपडे वगैरे लपवून ठेवतात. त्यामुळे नेहमीच्या जागेत गुप्त जागी लपविलेला माल पोलिसांना मिळणे शक्य नसते. अशा करिता क. २७ ची उपाय योजना करावी लागते. माहितीप्रमाणे प्रत्यक्षात मुद्येमाल मिळतो. याचा अर्थच माहिती खरी असते आणि वस्तू मिळण्याची खात्री असते. त्यामुळेच अशा माहितीस फार महत्व दिले जाते.

**आवश्यक गोष्टी :-**

कलम २७प्रमाणे आरोनीचे निवेदन ग्राहय होण्याकरिता खालील गोष्टी आवश्यक आहेत.

१. गुन्हयाचा आरोप कसा इसमावर पाहिजे.

२. निवेदन करतांना तो पोलीसांचे अटकेत असावा.

३. दिलेल्या कबुली जबाबमुभ् एखादी गोष्ट वस्तू वगैरे मिळावयास पाहिजे.

४. दिलेल्या माहितीचा, निवेदनाचा सापडलेल्या वस्तूशी संबंध पाहिजे.

**कबुली जबाब-कोणता भाग ग्राहय असतो?**

"मी घराचे मागे बंदूक गाडून ठेवली आहे." "चोरीची घडयाळे, दागिणे गुलाबशेठ सोनाराकडे ठेवली आहेत. "अशीच विधाने ग्राहय आहेत.

## रेल्वेवरील गुन्हे

**रेल्वे :-**

राष्ट्रीय संपत्ती, जनतेची मालमत्ता, रेल्वेवरील वाढत्या गुन्हेगारीमुळे रेल्वेची व देशाची आर्थिक हानी रेल्वेचे जाळे संपूर्ण देशभर सुरक्षिततेसाठी रेल्वे संरक्षक फोर्स व रेल्वे पोलिस.

**गुन्हयाचे प्रकार :-**

(अ) रेल्वे प्रवाशांच्या चोऱ्याः-

वेटिंगरुम चालती गाडी यातून सामानाच्या चो-या (बळाचा वापर करुन किंवा न करता)

खिसे कापणे.

गुंगीचे पदार्थ, विषारी पदार्थ देऊन गुन्हे करणे.

अनेक मार्गांनी फसविणे.

रेल्वे टपालाच्या चोऱ्या.

(ब) रेल्वे, हस्तांतरीत केलेला वहातुक करण्याचा माल :-

गुडसशेड पार्सल ऑफिसमधील चोऱ्या.

यार्डातून वॅगन सील सोडून

चालत्या रेल्वे मालगाडीतून होज पाईप काढून, ग्रीस लावून किंवा गाडीतून सामान फेकून चोऱ्या.

(क) रेल्वे मालमत्तेच्या चोऱ्या :-

रेल्वे स्टोअर्समधून, यार्ड किंवा मार्गावरील, ट्रेनमधील सामान.

(ड) फसवणूक करुन रेल्वेचे नुकसान :-

बागेत रेल्वे रसीद तयार करणे, गर्दीचे वेळी बाद तिकीटे वापरणे, जवळची तिकीटे लांब पल्यास वापरणे.

(इ) राजकीय, इतर हेतु साध्य करणेस घातपात नुकसान करणे.

**तपासीबाबत सूचना :-**

१. हद्दीबाबत वाद टाकून त्वरीत तपास सुरु.

२. गुन्हयाची पध्दत व रेकॉर्डचा अभ्यास.

३. फिर्यादीस काळजीपूर्वक विचारपूस.

४. घटनास्थळीचे निरिक्षण-छायाचित्रण वेगवेगळया दिशेने.

५. सर्व शास्त्रोक्त पध्दतीचा उपयोग.

६. वॅगनचोरी पध्दत नंबर नोदंविणे ते वॅगन उघडली ती जागा.

७. रेल्वे ड्रायव्हर, गार्ड यांना विचारपुरावृत्तीबाबत.

८. जुने रेल्वेवरील गुन्हेगारास विचारपूस जि. पो. ठाणे संपर्क.

९. खबरीस विलंब-त्याचे वर्तनाची चौकशी.

१०. वॅगनवरील सील, लेबल जप्त करणे.

११. आर.पी एफ रेल्वे अधिकारी संबंध पडताळणे.

१२. रेल्वेच्या निशाण्या असलेला माल-शोधणे जप्त करणे.

१३. बातमीदाराचा उपयोग करणे.

१४. रिसिव्हरवर वॉच-माल घेण्याची पध्दत.

१५. मालाची वाहतुक-ट्रकचा वापर शोध घेणे व अटकावून ठेवणे.

१६. रेल्वे खात्यातील वेगवेगळया विभागाची माहिति घेणे.

१७. रेल्वे रिसीट आर आर बनावट वापरल्या असतील तर संबंधित पार्सल क्लार्कने तपासल्यात कां? याची माहिती घ्यावी.

१८. चिफ कर्मशियल सुपरिटेंडेंट यांना आदेश दिल्याप्रमाणे तपासणी केली काय हे पहावे.

१९. घातपाताचा प्रकार असल्यास अत्यंत बारकाईने तपास करावा. आवश्यक असल्यास डॉग असल्यास स्क्वॉडची मदत घ्यावी.

## तपासाची रुपरेषा
### (केसडायरी)

**तपासाचा आरंभ :-**

१ पहिली खबर कोठे, केव्हा कशी मिळाली.

२. प. खबरीची नोदं

३. संज्ञेय गुन्हा नोदंणी पुस्तकात नोदं (१५४)

४. मॅजीस्ट्रेटला प्रत (१५७)

५. गंभीर अपराधाच्या बाबात खास प्रतिवृत ए. स्पी.

६. अपराध माहित नसेल तर पो. स्टे. ला शेजारचे

**गुन्हयाच्या परिस्थीतीची पहाणी करणेः-**

१. गुन्हयाची जागा पहाणे. (१५७)

२. परिस्थितीची पंचनामा, जप्त केलेल्या वस्तू त्यांचे मुल्य

३. अवश्य असलेल्या गुन्हयात नकाशा

४. खून, अपघाती मरणाबाबत इक्व्हेस्ट पंचनामा (१७४ (१७६)

५. उत्तरीय तपासणीला पाठविणे

६. जखमीनां औषध उपचार वरीष्ठ आगमन.

**तोंडी पुरावा :-**

१. साक्षीदार तपासणे त्यांची टिपणे.

२. मरणोन्मुख जबानी मॅजीस्ट्रेट / मेडी ऑफिसर

३. साक्षीदार यांचे योग्य बाबतीत १६४ प्रमाणे जबाब.

४. साक्षीदारा यांच्या इतर पो. स्टे. मार्फत जबाब घेणे ची व्यवस्था करणे.

**दस्तैवजी पुरावा, किंवा मालमत्ता :-**

१. ठाणे अंमलदाराने दस्तैवज हजर करणे बाल आदेश काढणे (९१)

२. ९२ पोस्ट, तार खाते दस्तैवज अधिकाऱ्यांकडून मिळविणे किंवा ती अटकावून ठेवणे.

३. सी. आर.पी.सी. १६५ प्रमाणे झडतीची कारणे नोंदणे

४. १६६ दुसरे पोस्ट हाताखालील कर्मचारी.

५. जप्त वस्तू फिर्यादी साक्षीदार यांनी ओळखलेली नोदं. सदरबाबत पंचनामा करणे, १०० ,१६५

६. पंचनाम्याची प्रत देणे मालकास जेव्हा माल मिळून येत नसेल राजपत्रांत प्रसिध्दी करणे.

**परिस्थितीजन्य पुरावा :-**

(१) वस्तु (२)डाग (३)दस्तैवज (४)धूळ (५) खुणा (६) अगनीशारत्रे विष.

**तज्ञाच्या मताचा पुरावा :-**

क. २९३ अन्वये कार्यरिती अवलंब.

**आरोपीला अटक करणे :-**

(१) हाताखालील लोकांना आदेश क. ५५ (२) पो. ठाणे अमं.ने क.४३६, ४३७ अन्वयेवर (3) अटक क (४२) (१)अन्वये केलेली मागणी दुसऱ्या अधिकाऱ्याकडे (४) क. ७० अन्वये अधिपत्र (५) आरोपीची स्लीप घेऊन पाठविणे (६) क. ८२ प्रमाणे जाहीरनामा, जप्तीची मागणी क. २९९ प्रमाणे पुरावा नोदंणे .

## दोषारोप -पत्र

आरोपी विरुध भरपूर पूरावा जमा झाल्याची खात्री झाल्यानंतर त. अ. आरोपी विरुध्द क्रि. प्रो. को. क. १७३ प्रमाणे जे आरोपपत्र सादर करतो त्यास दोषारोप पत्र म्हणात.

**दोषारोप-पत्र केंव्हा पाठवावेः-**

आरोपीने गुन्हा केल्याचे सिध्द करणारा सकृत-दर्शनी पुरावा असला पाहिजे.

न्यायाचे दृष्टीने आरोपीवर खटला चालविला गेला पाहिजे अशी परिस्थिती पाहिजे.

गुन्हयाचे संबंधी पुष्टी देणारी चांगली कायदेशीर बाब असावी. आरापीविरुद्ध भक्कम पुरावा असून सुध्दा त्याला संशयाचा फायदा मिळू शकेल,

पोलिसांनी मिळविलेल्या पुराव्या इतकाच भक्कम पुरावा आरोपीच्या बाजूनेही उपलब्ध असण्याची शक्यता असते. अशावेळी सुध्दा चार्जशीट पाठवून द्यावे.

**अत्यंत महत्वाची बाब :-**

गंभीर स्वरुपाचे व गुंतागुंतीच्या गुन्हयात दोषारोपपत्र लिहिण्यापूर्वी आपल्या पोलिस प्रॉसिक्युटर, सरकारी वकील यांच्याशी कागदपत्रासह चर्चा करावी व त्याबाबत त्याचा सल्ला घ्यावा.

**चार्जशीटमध्ये व बरोबर काय माहिती - कागदपत्रे असावीत :-**

१. नमूद कॉलममध्ये सविस्तर, स्पष्ट, मुद्येसूद माहिती भरणे.

२. दोषारोप रकान्यात गुन्हा केल्याचा प्रकार व स्वरुप व आरोपी विरुध्द ते सकृतदर्शनी कला सिध्द होतो याची स्पष्ट माहिती भरावी.

३. संबंधित साक्षीदारांची स्वतंत्र यादी व तक्ता खालील प्रमाणे -

अ. अनुक्रम नंबर

ब. साक्षीदाराचे नाव

क. काय पुरावा देणार (तोंडी अगर दस्तऐवजी)

ड. कोणत्या आरोपीविरुध्द

इ. कोणत्या मुद्यावर पुरावा

४. पुरावा ज्यावर आधारीत आहे अशी सर्व कागदपत्रे.

५. चोरीस गेल्या मालाची खबरीप्रमाणे सविस्तर यादी. (असल्यास)

६. आरोपी, इतर तऱ्हेने मिळालेली मालमत्ता यादी क्रमवार.

७. आरोपीच्या पूर्व शिक्षेची यादी.(क्र. ७५ पी.सी. करीता)

८. आरोपी मुका, बहिरा असल्यास ओळखीच्या - संबंधी माहिती.

९. जामीन कदबे किवां हमीपत्रक .

१०. जरुरी प्रमाणे "सैक्शन आर्डर"

११. कोर्टाचा आदेश असल्यास आरोपीला देण्यासाठी कागदपत्रांच्या नकला (क्रि. प्रो. को.क. प्रमाणे ही जबाबदारी कोर्टाची आहे.

सन १९०७४ मधील क्रि. प्रो. कोडमधील सुधारणा प्रमाणे वेळोवेळी वाढवून मिळणारी रिमांड ही एकून ९० दिवसांपेक्षा जास्त वाढवता येत नाही. ( गंभीर गुन्हयात ९० दिवस, पुरवणी १९७८ )

**दोषारोपपत्राचें शेवटी खालील माहिती लिहावीः-**

अ. साक्षीदार तपासण्याची तारीख पोलिसांनी ठरवावी.
की मॅजिस्ट्रटने ठरवावी.

ब. पोलीसांनी खटला चालविण्याची काय व्यवस्था केली.

क. साक्षीदारांना पोलिस कोर्टात हजर करतील की त्यांना मॅजिस्ट्रटने समन्स पाठवावीत.

ड. कोणी साक्षीदार सरकारी नोकर आहे काय व त्याला त्याच्या वरीष्ठा मार्फत समन्स पाठविण्याची आवश्यकता आहे काय.

इ. दोषारोपपत्र पाठविण्यात आलेल्या आरोपी पैकी कोणी कबुली जबाब दिला आहे काय?

फ. इ. पि. को. क. ७५ लागू आहे काय व त्यासाठी आरोपीच्या बोटाचे ठसे घेऊन पूर्व-शिक्षेची माहिती मिळविण्या करिता ते फिंगर प्रिंट ब्युरोकडे पाठविले आहेत काय ?

ज. जास्तीचे साक्षीदार हजर करण्यात येतील काय?

च. कोणती वस्तू केमिकल अनालायझरकडे पाठविण्यात आली आहे काय?

ह. आरोपीला जामीनावर सोडण्यात पोलीसांचा विरोध आहे काय ?

टीपः- माफीच्या साक्षीदाराचे नाव आरोपीच्या रकान्यातच लिहावे.

● ● ●

# अखेरचा अहवाल

ज्यावेळी आरोपीच्या विरुध्द सकृतदर्शनी पुरावा नसेल त्यावेळी क्रि. प्रो.को.

क. १७३ नुसार अखेर रिपोर्ट पाठविला जातो.

**कोणाकडे मुंजुरी साठी पाठविला जातोः-**

उप-विभागीय पोलीस अधिकारी (जिल्हा) सहाय्यक पोलीस आयुक्त (पो. आयुक्तालय)

प्रकार

१. **अ-फायनलः-** दिलेली खबर खरी गुन्हा उघडकीस येत नाही. आरोपी विरुध्द पुरावा नाही. किंवा आरोपी फरारी आहे.

अ. अ-फायनल (अबेटेड)-आरोपी निष्पन्न पण तो मरण पावला आहे.

२. **ब-फायनलः-** दिलेली खबर खोटी व जाणूनबुजून द्वेषबुध्दीने दिली आहे.

१. प्रासिक्युशन सह २. प्रॉसिक्युशन विरहित.

३. **क-फायनल :-** खबर संपूर्ण खोटीही नाही व खरीही नाही. गैरसमजुती ने दिलेली किंवा दिवाणी स्वरूपाचा गुन्हा असतो.

४. **नॉन कॉग्नीझेबल फायनल :-** तपासाअंती खबर दिलेला गुन्हा हा अदखलपात्र आढळून आल्यास.

५. **अपुव्हड समरीः-** ज्यावेळेस क. १५७ (ब) प्रमाणे तपास नाकारला जातो त्यावेळेस.

क्रि. प्रो. को. क. २०२ प्रमाणे तपासाचा आदेश मॅजिस्ट्रेटकडून असेल तर परस्पर पाठविला जातो.

**तपासाचा अखेर रिपोर्ट पाठवितांना लक्षात ठेवाः-**

तपासाची सर्व कागदपत्रे फेरिस्तसह पाठवा.

समरी मिळाल्यास योग्य नोंद घ्या.

जप्त मुद्येमालाची विल्हेवाट करतांना कोर्टाचे आदेश घ्या.

अहवाल गुन्हयाचा तपास कां नाही याचे कारणाचे सविस्तर विवेचन करा.

आरोपी अटकेत असतील तर त्यांना सोडून देण्याची विनंती करा. जामीना वर असतील तर संबंधीत जामीन कदबे रद्द करण्याबाबत विनंती करा.

अहवाल सक्षिप्त पणे मुद्येसूद असावा.

**अखेर रिपोर्ट केल्यावर**

वरीष्ठ पो. अधिकारी हा अहवाल परत करुन अधिक तपास करुन चार्जशीट पाठविण्याचा आदेश देऊ शकतात.

**कोर्टः-**

अखेर रिपोर्टावर चार्जशीट पाठवण्याचा आदेश कोर्ट देऊ शकत नाही.

**विशिष्ट प्रकारच्या गुन्हयांचा तपासः-**

**खुन (महत्वाचे मुद्ये)**

**खुनाचे प्रकारः-**

- विष प्रयोग x उपाशी ठेऊन x मारहाण करुन
- पाण्यात बुडवुन x अग्नीशस्त्राचा वापर करुन
- तीक्ष्ण हत्याराने भोसकून x स्फोटक पदार्थ वापरुन x गळफास लावून
- जाळून, भाजून x इलेक्ट्रीकचा शॉक देवून x छळ हुंडाबळी इ.

उद्येशः-

- फायद्यासाठी x शत्रूत्वावरुन.x अनैतिक संबंध x राजकीय
- जमीन इस्टेटबाबत x भाऊब दकी वा इतर वाद.

**गुन्हा उघडकीस आला असल्यासः-**

- आरोपीस अटक-वापरलेले हत्यार, रक्त, कपडे जप्ती, साक्षीदार असल्यास त्यांना अटक
- मृतांचे नातेवाईक व इतरांकडे चौकशी-
- खुनाचा अद्येश-लेखी, तोंडी पुरावा.
- मृत इसम व आरोपी यांचा संबध जोडणे. प्रत्यक्ष साक्षीदारांचे जबाब-विसंगती व रहाण्याबाबतची खबरदारी घेणे.
- भौतिक दुवे योग्य तज्ञांकडे पाठवून आरोपीचा गुन्हयाशी संबंध जोडणे.

**अनोळखी मृतदेह असल्यासः-**

- विविध कोनांतून फोटो काढावेत.
- जवळील वस्तु जप्त करुन सांभाळून ठेवणे.
- बोटोचे ठसे घ्यावेत.
- सर्वा यावरील विशेष ओळखण्याच्या खुणा दातगतसोने अगर चांदी पहावे.
- हरवलेल्या इसमांशी प्रेताची जुळवणी.
- कपडयांवरील धोबी, टेलर मार्क-ओस्खटनेस
- दवंडी-तपास याचा, वायरलेस संदेश, फोन, वर्तमानपत्रे, आकाशवाणी. दुरदर्शन इत्यादी.

**प्रेत मिळाले नसल्यासः-**

तपासी अंमलदाराने अतिशय दक्ष रहावे. कारण सर्व पुरावा गोळा केल्यानंतर कोर्टात खटला चालू असतांना खून झालेली व्यक्ती हजर होते. त.अं.वषो. खात्याची फारच केविलवाणी स्थती होते-त्याकरिता सर्व परिस्थितिजन्य पुरावा गोळा करुन वरीष्टांशी विशेषत डायरेक्टर ऑफ प्रॉसकक्युशन यांचे मत घेऊन मगच खटला पाठवावा.

**गुन्हा उघडकीस आलेला नसल्यास-**

- घटनास्थळास त्वरीत भेट-सूक्ष्म निरीक्षण-
- दुवा शोघणे-ठसे, वस्तु इ. तज्ञास प्राचारण-
- मृत इसम घटनेपूर्वी कोणा सोबत दिसला?
- गुन्हयाचा उद्येश शोधण-घरातील लोक, नातेवाईक, मित्रमंडळी - अनैतिक संबंधाबाबबत बारकाईने चोकशी त्यासठी विश्वासात घेणे. तरुण-उपवर मुलींचा खून-अनैतिक संबध, बाहेरखालीपणाचा संशय-घरचेच आरोपी.
- नवविवाहितेचा-हुंडा अगर अन्य कारणाने छळ करुन मृत्यू-साखरचे लोक-आत्महत्येचा बहाणा करतात. अशा त्रेळी-शेजारी व मुलीचे माहेरचे लोक यांचकडे चौकशी व वैद्यकीय अधिकाऱ्यांशी मृत्यू कारणाबाबत-चर्चा.
- चोरी-उद्येश-असल्यास क्राईमरेकॉर्ड व बातमीदार यांचे सहाय्याने गुन्हा उघडकीस आणण्यासाठी प्रयत्न करावेत.
- त्या भागातील अचानक नाहीशी झालेली व्यक्ती व चौकशी.
- शहरातील प्लॉट मध्ये खून झाला तर ?
- पूर्वी, हल्लीकाम करणारे नोकर, दूधवाले, पेपरवाले, फेरीवाले, रद्दीवाले भगारवाले, इलेक्ट्रीशियन, भाडोत्री इ. शोधून काढावे - व त्यांचकडे चौकशी करावी.

## विशिष्ट प्रकारच्या गुन्हयाचा तपास

**दरोडा व जबरी चोरी:-**

१. गुन्हयाची खबर मिळताच ताबडतोब गुन्हयाच्या जागी भेट द्यावी व व फिर्यादी व साक्षीदारांकडे विचारपूस करुन आरोपीचे वर्णन, त्याचे कपडे, त्याची भाषा, त्यांनी वापरलेली हत्यारे वगैरेबाबत माहिती मिळवावी.

२. गुन्हेगार ज्या दिशेला पळून गेले असतील त्या भागातील पोलीस स्टेशन ला बिनविलंब गुन्हयाची माहिती व गुन्हेगाराचे वर्णन कळविण्याची व्यवस्था करावी. त्याचप्रमाणे त्या दिशेला जी गावे असतील तेथील पोलीस पाटलांना सावध करावे. त्यानंतर वायरलेस, टेलीफोन वरुन आजुबाजूच्या सर्व पोलीस ठाण्यांना गुन्हयाची माहिती कळवावी.

३. गुन्हयाच्या जागेचे बारकाईने निरीक्षण करुन भौतिक दुवे शोधण्याचा प्रयत्न करावा. बोटांचे ठसे मिळून आलयास ठसे तज्ञाला बोलावून त्याचे फोटो घेण्यास तावाचे आरोपीची एखादी वस्तू त्याठिकाणी मिळून आल्यास श्यानपथकाला पाचारण करावे.

४. साक्षिदारांनी दिलेली माहीती व उपलब्ध क्राईम रेकॉर्ड यावरुन संशयितांचा अंदाज करुन त्यांचा शोध घ्यावा. त्यांच्या हालचालीची खात्री करावी व आवश्यकतेनुसार झडत्या घ्याव्यात.

५. साक्षीदाराने आरोपीना स्पष्टपणे पाहिले असल्यास पोलिस स्टेशन व जिल्हा गुन्हे-कार्यप्रणालीकडील गुन्हेगारांचे फोटो त्यांना दाखवावेत.

६. चोरीचा माल घेणारे इसमांचे घरावर कमीत कमी एक आठवडा गुप्त वॉच ठेवावा.

७. भटकणाऱ्या गुन्हेगारी टोळयांचे बद्दल माहिती मिळवावी व जवळपास त्यांच्या मुक्काम असल्यास त्यांच्या झडत्या घ्याव्यात.

८. बातमीदारांचा उपयोग करुन गुन्हेगारांची माहिती काढण्याचा प्रयत्न करावा.

९. संशयीत आरोपी मिळून आल्यास व फिर्यादी, साक्षीदार यांनी गुन्हा करतांना पाहिजे असल्यास त्यांची नियमाप्रमाणे ओळख परेड करवून घ्यावी.

**घरफोडी**

१. गुन्हयांचे जागी भेट देऊन गुन्हयाची कार्यपध्दती पहावी. व त्याचा बारकाईने अभ्यास करावा. त्यानंतर पोलिस स्टेशनचे रेकॉर्ड, एन. ओ. बी. रेकॉर्ड व कॅम्प्युटर रेकॉर्ड यावरुन त्या पध्दतीने गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांची यादी तयार करुन अशा सर्व गुन्हेगारांना तपासावे. त्यांच्या हालचाली पडताळून पहाव्या व यांच्या झडत्या घ्याव्यात.

२. गुन्हयाच्या जागी बारकाईने तपासणी करुन त्या ठिकाणी गुन्हेगारांच्या बोटांचे ठसे, गुन्हेगाराने हाताळलेली एखादी वस्तु अगर दुवे मिळतात का ते पहावे. व मिळून आल्यास ठसे तज्ञ, श्वानपथक व इतर तज्ञांना पाचारण करावे.

३. गुन्हयाची पध्दती ही एखाद्या गुन्हेगार टोळीच्या पध्दतीशी मिळती जुळती असल्यास अशा प्रकारच्या टोळयांचे वास्तव्य जवळपास आहे. किंवा कसे या बद्दल चौकशी करावी व असल्यास त्यांच्या झडत्या घ्याव्याततत. या कामी शहरांमध्ये शेजारच्या सर्व पोलिस ठाण्याकडून व खेडयांमध्ये आजुबाजूच्या खेडयातील पोलिस पाटलांकडून माहिती मिळवावी.

४. चोरीचा माल घेणाऱ्यांचे वर गुप्त वॉच ठेवावा.

५. बातमीदारांना गुन्हयाबद्दल व चोरीला गेलेल्या मालाबद्दल माहिती देऊन त्यांचेकडून बातमी मिळविणेचा प्रयत्न करावा.

### दंगे

गैरकायद्याची मंडळी क. १४१ आय.पी.सी. - चारपेक्षा अधिक इसम कायद्याने वर्ज्य असलेली कामे सामाईक उद्देशाने करण्यासाठी एकत्र जमतात.

**दंगे होण्याची कारणे खालील प्रमाणें असू शकतात :-**

| | |
|---|---|
| जमीनीचा तंटा | औद्योगिक अशांतता व कामगारांचे प्रश्न |
| राजकीय चळवळ | जातीय उद्रेक |
| राजकीय पक्षातील | विरोध, वैमनस्य, गटबाजी, विद्यार्थी चळवळ |

तपास करतांना लक्षात ठेवण्याचे मुद्दे :-

गुन्हयांचे जागे बद्दलचा निश्चित पुरावा.

आरोपींचा शोध व विशिष्ट पध्दतीने भाग

लुटीबाबत मालमत्तेचे वर्णन व माहिती

आरोपीकडून हत्याराचा वापर/बाळगणे या बाबत सुस्पष्ट पुरावा.

फिर्यादी/अरोपी पक्षाचे जखमाची तपासणी.

नोंद :- घटनास्थळी दगड, हत्यारे, पादत्राणे, रक्ताचे, डाग, इ. जप्त करणे.

गुन्हयाचे ठिकाणाचा पंचनामा व फोटो.

गुन्हयाचे ठिकाणचा नकाशा काढणे

आरोपीची ओळख परेड घेणे.

क्रॉस कम्प्लेंट दोन्हींचा स्वतंत्र तपास.

खबरीवरुन खरे खोटेपणा शोधण्याचा प्रयत्न.

हेतु शोधून तसा पुरावा गोळा करावा.

हत्यारे हस्तगत करण्यासाठी पी.सी.आर. घ्यावी.

साक्षीदार आरोपी यांनी केलेल्या कृत्याप्रमाणे तक्ता तयार करुन त्याप्रमाणे साक्षीदारांची टिपणे तयार करावीत.

## साक्षीदार टिपणी तक्ता

| | आरोपी नं. १ | आरेपी नं. २ | आरोपी नं. ३ |
|---|---|---|---|
| साक्षीदार नं. १ | शिवीगाळ अंगावर आला | हातात कुऱ्हाड होती | काठनी "अ" यास मारले |
| साक्षीदार नं. २ | साक्षी नं. १ याचे अंगावर धावून गेला व शिवीगाळ केली. | हाती कुऱ्हाड घेऊन मारण्याची धमकी देत होता. | काहीच पाहिले नाही. |

# बलात्कार

## फिर्यादी

आरोपी :- नाव, पत्ता, ओळख कशी नातेसंबंध व्यवहारीक इतर

| अ. सावज व संशयीत | ब. गुन्हयाची जागा. | क. तपासणी ड. सावज संशयीत |
|---|---|---|
| जप्त करुन ताब्यात घेणे<br>१. कपडे<br>२. वीर्य<br>३. केस<br>४. गुन्हयाचे ठिकाणी असलेले अवशेष | जप्त करुन ताब्यात घेणे<br>१. फुटलेल्या बांगडयाचे तुकडे इतर वस्तू बूट चपला इ.<br>२. दोघांचे कपडयावर मिळालेल्या मातीशी तुलना करण्यासाठी मातीचे नमुने.<br>३. चादर सतरंजी या व्यतीरीक्त वीर्य डाग आहेत.<br>४. झटपटीच्या निशाण्या पाहून तेथील विशिष्ठ नमुदे वस्तू | १. वय<br>२. प्रतिकारशक्ती<br>३. जखमा शरीराचा गुप्तभाग<br>४. गुप्तभागावरील वीर्य पुरुषाचे केस, स्त्रीचे केस तपासणी प जप्त जतन<br>५. नखात कातडयाचे कण रक्त, केस इ.<br>६. झटपटीच्या खुणा<br>७. संभोग क्षमता, सरसावलेली |

पुरावा :- १. वरील अ,ब,क,ड, दुबे दोघांचे रक्त, केस, कपडे नमुने तज्ञाकडे पाठवा. अभिप्राय घ्या.

२. आरडाओरडा सावजाने नातेवाईकांकडे सांगीतलेली हकीगत अंगावरील फुटलेल्या बांगडया झटपटीत झालेली ऊल थापालथ, वय, पालक जन्मरजिस्टर शाळेचा दाखला, जन्मपत्रिका वैद्यकीय मत १६ वर्षाचे आतील असली व समत्ती असली तरी बलात्कार होतो.

# मोटार अपघात

## तपासणी

अनेक प्रकारच्या वस्तू पुरावा.

| टायरच्या खुणा | वैद्यकीय तज्ञ | कपडयावर शोध :- |
|---|---|---|
| **रस्ता :-** कच्चा कठीण ओला सध्या ब्रेकच्या कचरा, धुळ रंगाचे छिलके तुटे / तुटलेले भाग कपडयाचे तुकडे धागे सुते, रक्त केस त्वचेचे तुकडे वाहनाची ओळख पटण्यासाठी<br><br>जागा | **धक्का :-** कोणता कोन सरळ, धक्का, ओझरता चाक, अंगावरुन, मृत फरफडत, वाहानातुन पडून अंगावर टायर व्यक्ती - ऊभी, बसलेली अगर आडवी फोटो शरीरावर, काचेचा तुकडा रंग, तत्सम वस्तू वहान शोधणेस मदत काचेचे तुकडे, रंग कण, तेल, वगंण, रत्या, धूळ, धागे, टायर खूणा तपासणी रक्त, लघवी केस नमुना<br><br>जखमी वा मृत. | अधिकृत यंत्रज्ञ आर. टी. ओ. धुवू नका स्वच्छ करु नका फिंगर प्रिंट, (चान्स) काचाचे तुकडे, रंग चिकटलेली माती, वनस्पती रक्त केस, धागे, कातडी योग्य रितीने काढून घ्यावेत. वाहन चालकाची तपासणी करुन घ्यावी. दारु प्याला अगर कसे याची खात्री करा.<br><br>वाहन |

## ठकबाजी

दोन प्रकारे केली जाते :-

१. तोतयेपणा किंवा बतावणी करुन फसविणे.

२. इतर प्रकारे फसविणे

| अ.नं. (१) | अ.नं. (२) |
|---|---|
| पोलीस, सी. आय.डी. अधिकारी, सरकारी नोकर, डॉक्टर असल्याचा बहाणा करुन पैसे उकलणे. | बनावट दागीन्याची लबाडी. दागीने पैसे दुप्पट करुन देतो. सांगून किंवा साधूचे धार्मिक रुप घेऊन देव भोळया लोकांना काही तरी देऊन, फसविणे, धर्मार्थ संस्थातर्फे वर्गणी गोळा करण्याची बतावणी करुन पैसे घेणे . |

**तपास करतांना खालील मुद्दे लक्षात घ्यावेत :-**

- आरोपीने काय धाक अगर बतावणी करुन फसविले याचा पुरावा जमा करावा.
- ज्या पध्दतीने गुन्हा घडला त्या संबंधात सी. आय. डी. कडील रेकॉर्ड मागवावे व आरोपीचा तपास करावा.
- आरोपीने फिर्यादीची संमती फसवून मिळविलेली असते त्या संदर्भात तपास करा व पुराव जमा करा.
- फिर्यादीकडून आरोपीचे वर्णन, बोलण्याची पध्दत पोषाख याबाबत माहिती घ्या रेकॉर्ड वरील फोटो दाखवा.
- एजंट असण्याची बतावणी करुन मालाची आर्डर नोंदवून घेण्यासाठी अडव्हान्स घेतला असेल तर ऑर्डर फार्म ताब्यात घ्या व्हिजीट कार्ड असेल तर ताब्यांत घ्यावे.
- पैसे दुप्पट करुन देणे, भाडयाची खोली मिळवून देणे, मोठया फर्म बँकेत नोकरी मिळवून देतो त्यासाठी वशीला असण्याची बतावणी करणे गुप्त धन शोधून देतो तसेच लग्नसंस्थेद्वादा लग्न जमवून देण्याची बतावणी करणे श्रीमंत व कुलीन मुलगी म्हणून वेश्याशी लग्न लावणे इत्यादी फसवा फसवीचे प्रकार आहेत. अशा गुन्हयांत अस्तीत्यातील आहे असे भासविले असेल तर फर्मची माहिति त्वरीत मिळवावी अधिकाऱ्या कडे सदरहू इसम नोकरीस आहे काय लेखी दाखला घ्यावा.
- लॉज, धर्मशाळा, रेल्वे बेटींगरुम रेल्वे रिटासंटींग रुम येथे शोध घ्यावा.
- आरोपीला अटक केल्यावर त्याची घर झडती घेऊन गुन्हयाचे संबधीत कागदपत्रे छापील कागद नोट बूक कॅशबुक, चेकबुक कपडे-खोट ओळखपत्र ई. जप्त करावे.
- त्याच्या गांवी जाऊन त्याचा कामधंदा या बाबत शहनिशा करावी व पुरावा गोळा करावा.

## अन्यायाने विश्वासघात करणे.

**अन्यायाने विश्वासधात केला कसे समजावेः-**

काही माल अगर मालावरील सत्ता कोणत्याही रितीने कोणा मनुष्याकडे दिली असून तो लबाडीने त्या मालाचा-गैरशिस्त उपयोग करील अगर तो माल आपल्या कामाला घेईल अगर मालावरील सत्तेची व्यवस्था कोणत्या रितीने करावी या विषयी कायद्यातील नियम मोडून त्या मालाचा गैरशिस्त बुध्दीपूर्वक उपयोग करील किंवा दुसरे कोणास तसे करु देईल तर त्याने अन्यायाने विश्वासघात केला असे समजावे.

**तपासाचे मुद्देः-**

१. विशिष्ट शर्तीवर किंवा विशिष्ट कारणासाठी माल आरोपी कडे सोपविला होता या संबंधात पुरावा गोळा करावा.

२. असे सोपविलेले काय विशिष्ट पध्दतीने शर्तीप्रमाणे आरोपीने करणे भाग होते या संबंधी कागद पत्राचा पुरावा जमा करावा.

३. माल विश्वासाने सोपविला जाताया मुद्यावरुन पुरावा गोळा करुन त्यांत समक्ष असणारे लोक यांच्या जबान्या सविस्तर घ्याव्यात.

४. लबाडी सिध्द करण्याच्या दृष्टीने पुरावा गोळा करावा.

५. ज्या मालाचा गेरशिस्त उपयोग झाला असेल तो माल जप्त करा.

६. मालाचा गैर-शिस्त उपयोग ज्याच्या मध्यस्तीने केला असेल त्या इसमाचा पुरावा घ्या.

## अफरा तफर

(खाजगी पैसा, वस्तु) — (सरकारी पैसा)

आय. पी. सी. ४०६ — आय. पी. सी. ४०८, ४०९

अकौंटचे ज्ञान असणे आवश्यक आहे. जमा खर्चाची पध्दत, व्हौचर, खर्ची रक्कम या बाबत माहिती असणे आवश्य आहे. तसेच कागदपत्र ताब्यांत घेणे आवश्यक आहे. तसेच कागदपत्र ताब्यांत घेणे आवश्यक असते. काहीवेळा अफरातफर करतां खोटे दस्तैवज बनविले जातात.

**अफरा तफरीचे प्रकारः- (बँक, व्यापारी, सरकारी)**

- कर्जदाराची सही करुन पैसे दिल्याचे दाखविणे.
- आपल्या ताब्यांत असते वेळी सरकारी किंवा दुसऱ्याची रक्कम ही स्वतःच्या फायद्यासाठी वापरणे, खर्च करणे.
- खोटे हजेरीपत्रके दाखवून त्या रकमा आदा केल्याचे दाखविणे.
- या गुन्हयाचा संबंध खोटा दस्तवैज व फसवणुक यांतही येवू शकतो.

**तपासा बाबत सूचनाः-**

- संस्थेच्या हिशोबाचे आडीट करुन घेण्याबद्दल संबंधीत अधिकाऱ्याला लिहावे, ऑडीट रिपोर्टाचा अभ्यास करावा.
- संस्थेचे संबंधित रेकॉर्ड ताब्यांत घ्यावे.
- संशयीत वहिमी, आरोपी अशा सर्व लोकांच्या मालमत्ता जगम मिळकत मिळवून जप्त होण्यास जिल्हा न्यायाधिश यांना रिपोर्ट पाठवा.
- संशयीत आरोपीचे बँकेतील खाते गोठविण्याबद्दल जिल्हांअधिकारी यांचे कडून आदेश मिळवावा.
- संगनमताने गुन्हा झाला असेल तर गुन्हा यशस्वी होण्यास प्रत्येकाचा सहभाग याचा पुरावा जमा करा.
- बनावट चेक्स, खोटया नोंदी खोटया पावत्या केल्या असतील तर संशयीतांचे अक्षराचे नमुने घ्यावेत. दस्तैवज जप्त करा. संबंधीत लोकाची कार्यालयीने आदेशानुसार काय जबाबदारी होती याची माहिती घ्यावी. मान्य हस्ताक्षराचे दस्तैवज, कागदपत्र ताब्यांत घ्यावे.
- आवश्यकतेनुसार संबंधित इसमांच्या घर झडत्या घ्याव्या. व्हौवचर मेमो, लेटरबील्स, अडव्हाईस नोटस याची फडताळणी हेशोबी पुस्तंकातील नोंदणी करावी. संशयीत हिशोबाच्या नकला जबाबदार अधिकाऱ्याची सही शिक्कयाने घ्याव्या.
- हिशोबाचे ज्ञान असलेले कर्मचारी मदतीस घ्यावेत.
- नोंदी न घेणे किंवा काल्पनीक नोंदी घेणे हे पहा, शोधा.
- कौटर चेकवर जादा रक्कम लिहीणे / जास्त कर्मचारी दाखवून पगार काढणे/ एकाच व्हौचरवर अनेकदा पैसे दिल्याची नोंद करणे/ कॅश बॉक्स मधून रक्कम उचलली/ कॅश बॉक्समध्ये तृटी दाखविणे.
- लेखी व तोडी पुरावा जमाकरावा.

## बनावट नाणी

ओतीव बनावट नाणी — ठोकून त्या आकाराची बनावट

**आढणारे दोष**

- घडण व फिनीश ओबड-धोबड
- निकेलचा द्रवबिंदे फार जास्त प्रमाण फार कमी किंवा नसते चाचणीस टिंकू शकत नाही.

* नारीक छिद्रे किंवा सहज दिसणाऱ्या खाचा
* कडांवर शिसे असते त्यामुळे मऊ.
* नक्षीकाम बरोबर सुबक नसते अक्षरे नीट नसतात. आकार तंतोतंत नसतो.
* आवाज बद्द येतो.

गुन्हयात मिळणारी साधने वस्तु पुरावा.

## गुन्हयांत मिळणारी साधने-वस्तु पुरावा

| | |
|---|---|
| सूचना रंगरुप आकाराचा नीट अभ्यास *चलनात आणणारा पकडलातर बारीक चौकशी *त्याचे कडून अशी नाणी तयार करणारे टोळीचीमाहिती *बातमी दाराकडून माहिती *गुप्त कडक नजर . *सी.आ.डी. क्राईम *कॉम्प्युटर गुन्हेगाराची माहिती *गुन्हेगार टोळीचा शोध, *गुन्हेगाराचे फिगर प्रिंट *मिंट मास्टर मुंबई-नाणी साहीत्य पाठविणे. | चिकणमातीचे साचे मूय, चिमटे, पटाशी शिलकी माती, (मूती मर्णी), कॉलर (गळपट्टी) चांदी, शिसे, कासे, इ. धातु, वितळलेली धातु, पळी कानस, पावडर (पॉलीश करतां), नाण्यांचा ठसा असलेले धातुचे पत्रे, *साचे * प्रेसींग मशीन *कानस * सुरी *तार *नरसाळे *पीन्स *कांच रेती *प्लॅस्टर *ऑफ पॅरहस * गंधक *राळ *डींक *मध *सिमेंट *तुरटी, बोटॅक्स रसायने. |

## खोटया चलनी नोटा

| बनविण्याचा प्रकार | दिसणारे दोष | वस्तु पुरावा |
|---|---|---|
| * फ्रि हॅंड, चित्रकला,<br>* हताने ट्रेसीग,<br>* हस्त लिखाण,<br>* नक्षीकाम करुन<br>* खऱ्या नोटेंत बदल,<br>* हाताने लाकडावर<br>* नक्षीकाम कोरुन,<br>* धातुप्लेटवर हाताने<br>* नक्षीकाम कोरुन,<br>* इटलिगो प्लेट,<br>* फोटोग्राफी, लियोग्राफी<br>ञ फोटो इलेक्ट्रीक पध्दत<br>* रासायनिक प्रक्रिया | कागद निकृष्ट, आकार कमी जास्त,<br>कडा घारदार नसणे.<br>जलचिन्ह नसणे वा अस्पष्ट आसणे.<br>अशोक स्तंभ, जलचिन्ह नसणे किंवा वेडेवाकडे सजावट, नक्षीकामांत नंबर ठराविक आकार ठराविक अंतर, खालीवर रंगाचा निस्तेजपणा किंवा भडकपणा<br>नोंटांना शिवणे, टांचणे यांच्या खुणा नसणे. | कोरलेले ठसे, ब्लॉक प्लेट ट्रेसिंग पेपर, कांच कपास, हिरवी, लाल, निळी शाई, ब्रश, ठसे उमटविणारे यंत्र, नोटे सारखा पांढरा कागद, निगेटेव्हि चुका फोटो ग्राफी साहित्य, निरानिराळी रसायने तेले. |

**तपासः-** सी. आय. डी. रेकॉर्ड वरील गुन्हेगारांची माहिती मिळवा.

* खोटया नोटा निदर्शनास आल्यास मुळ शोधणे.
* व्यवहारांत आणणेसाठी गुन्हेगराने काय अमीष दाखविले/युंक्ती
* बातमीद्वारा मार्फत ववेपांतर करुन टोळयांची माहिती काढावी.
* नोटा छापण्याच्या ठिकाणचा शोध, छापा, ब्लॉक, प्रेस, रसायने/पुरावा

- बनावट नोटा मॅनेजर इंडिया सिक्युरिटी प्रेस, नासीक यांना पाठवा. अभिप्राय मिळवा.
- नोटा बनविण्याऱ्या टोळीस आर्थिक मदत करणाऱ्या इसमाचा तपास करावा.

**जिवनावश्यक वस्तुची साठेबाजी, नफेबाजी व काळा बाजार**

**काळा बाजाराचे प्रकार:-**

१. परवान्यात नमुद केल्या पेक्षा जास्त साठा करुन तो बाहेर न काढणे. कृत्रिम टंचाई करणे.

२. उघड विक्री न करता काही ठराविक लोकांना गुप्त रितीने विकणे.

३. साठवून ठेवलेल्या वस्तू वाजवी भावापेक्षा जास्त भावाने विक्री साठी काढणे. गरजवंत चढत्या किंमती देऊन विकत घेतो.

अशा गुन्हयांचा तपास फार काटेकोर पध्दतीने व विशिष्ट प्रणालीने करावयाचा असतो.

जिवनावश्यक वस्तु ठरवून त्याचा साठा, किंमत, वाटप पध्दत यांचे नियोजन करणारा कायदा केलेला आहे.

**पोलिसांनी घ्यावयाची खबरदारी :-**

- साठेबाजी, नफेबाजी व काळा बाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांचा याद्या.
- पोस्टेचे रेकॉर्ड वर ठेवणे. तक्रार आल्यास बोगस गिऱ्हाईक पाठवून दुकानांवर छापा घालावा. माल व खुणांचे पैसे जप्त करा.
- अशा व्यापाऱ्यांची दुकाने, गोदामे याची माहिती काढा.
- कृत्रीम टंचाई निर्माण झाल्याचा संशय आल्यास गुप्त माहिती (बातमी) काढून गोडाऊन व इतरत्र छापे घालून माल जप्त करावा.
- विशीष्ट ठरवून दिलेल्या किंमती पेक्षा जास्त भावाने माल विकला असल्यास त्या मालापसून तीन स्वतंत्र नमुने घेऊन सील करावे, एक सिलबंद नमुना दुकानदाराला द्यावा त्याची नोंद पंचनाम्यांत करावी.
- मोठया प्रकारच्या गुन्हयांत शिधा वाटप अधिकारी यांना बोलवावे.
- साठा जप्त केल्यावर मा. कलेक्टर यांना कलम ६ प्रमाणे पत्रक पाठवावे.
- गुप्त साठयाची माहिती मिळण्यासाठी बातमीदारांचा उपयोग करावा. वहातुकीची साधने, वहाने, जनावरे वापरली ती जप्त करावी.
- परवाने तपासावे. * परवाने रद्द करण्यासाठी संबंधीत महसूल अधिकाऱ्याला लेखी कळवावे. * परवान्याच्या अटींचा भंग केला असेल तर त्या संबंधी सबळ पुरावा जमा करावा. * इतरत्र व्यापार केला कां ? * पध्दत ठरवून दिली त्याचे विरुध्द व्यवहार आला का ?

## प्रकरण दैनंदिनी (केस डायरी)

तपासी अंमलदाराने गुन्हयाच्या तपासात केलेल्या कारवाईचा क्रमवार घटनेप्रमाणे दररोज लिहिलेला एक दस्तऐवज. तो सुरु झाल्यापसून गुन्हयाचा निकाल लागेपर्यंत लिहिला जातो.

**उद्देश :-**

गुन्हयाचें तपासची सुसंबध्द माहिती ठेवणे. वरीष्ठ अधिकाऱ्यास वेळोवेळी गुन्हयाचें तपासाची प्रगति समजावी व त्यावर त्याची देखरेख असावी. पोलिस अधिकाऱ्याने मिळालेलया माहितीवरुन काय तजवीज केली हे न्यायालयात कळण्यासाठी उपयोग.

क्रि.प्रो.को. क. १७२ (१) प्रमाणे क्रि.प्रो. प्रकरण १२ (चॅप्टर) प्रमाणे तपास केलेल्या गुन्हयांचे बाबतीत ती ठेवावी लागते. तसेच क. १७२ (२) प्रमाणे पाठविलेल्या गुन्हयांचे चौकशी, तपास वेळी सुध्दा लिहावी लागते. क. १६७ (१) प्रमाणे आरापीला रिमांड साठी पाठवलेल्या गुन्हयांचे केस डायरी ची प्रत कोर्टास दिली पाहिजे.

:- क्रि. प्रो.को. क. १७२ (३) प्रमाणे जरी कोर्टाने केस डायरीचा संदर्भ घेतला तरी आरोपी किंवा त्याच्या वकीलास ती पहाता किंवा तपासता येत नाही. परंतु जर पो.अं. ने आठवण ताजी करण्यासाठी त्याचा उपयोग केला किंवा कोर्टाने त्या